cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१८ | सोमवार दि.०६ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शेती, शहर आणि शासनव्यवस्था

निसर्ग हा मूलत: लहरी आहे, हे आपण मान्य करतो. पूर्वीही अवकाळी पाऊस पडत असे; परंतु अलीकडच्या काळात त्याची वारंवारता आणि तीव्रता ज्या पातळीवर वाढली आहे, ती चिंताजनक आहे. महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेला वादळी वाऱ्यासह गारपिटीचा पाऊस हा केवळ हवामानातील बदल नसून, तो शेती, पर्यावरण आणि मानवी जीवनावर घोंगावणारा मोठा धोका आहे.

## थोडक्यात...

### उद्धव ठाकरेंचा सुनेत्रा पवारांना पाठिंबा

मुंबईः बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा दिल्याची माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली आहे. बारामती विधानसभेची जागा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे रिक्त झाली आहे. या ठिकाणी २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार उद्या सोमवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज भरतील. सुनेत्रा पवार यांनी शनिवारीच ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी फोनवरून चर्चा करून निवडणुकीत पाठिंबा देण्याची विनंती केली होती. त्यानंतर ठाकरेंच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पण आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ठाकरे या निवडणुकीत आपला उमेदवार देणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

### २ लाखांचे चंदन जप्त

लातूर : अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी नांदेड परिक्षेत्रात कामकाज करणाऱ्या विशेष पथकास लातूरवरून मध्यप्रदेशातील बुऱ्हानपूरकडे एका आयशर वाहनातून चंदनाची वाहतूक होणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यानूसार दि. ५ एप्रिल रोजी पहाटे, नांदेड जिल्ह्यातील लोहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत, लोहा ते नांदेड रोडवरील सई हॉटेलजवळ पथकाने आयशर वाहनातील ५२ लाखांचे चंदन व साहित्य जप्त केले. विशेष पथकाने आयशर वाहनास थांबविले असता, सदर वाहन प्रथमत: रिकामे असल्याचे आढळून आले. मात्र, आयशरचे बॉडीमध्ये ड्रायव्हरचे पाठीमागील साधारणत: तीन फूट जागेत, सहा फूट उंचीचा एक विशिष्ट कप्पा बनवण्यात आला असल्याचे पथकास आढळून आले. सदर वाहनावर चढून, त्यावरील ताडपत्री खोलून सदर कप्प्यात प्रवेश केला असता यात अनेक गोण्यांमध्ये चंदनाचे लाकूड भरले असल्याचे निदर्शनास आले. चंदनाने भरलेल्या गोण्या बाहेर काढून त्यांचे वजन केले असता, त्यात एकूण ३६ लाख रुपये किंमतीचे १,४७० किलो वजनाचे चंदनाचे लाकूड मिळून आले.

### अजित दादांच्या अपघाताची चौकशी करा–आठवले

पुणेः बारामती येथील पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, आणि अजित पवार यांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत केली. पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले की, बारामतीमधून सुनेत्रा पवार निवडणूक अर्ज दाखल करणार आहेत. त्यांनी मला प्रचारासाठी आमंत्रित केले असून, मी बारामतीला जाणार आहे. काँग्रेस पक्षाने अजित पवार यांचे योगदान लक्षात घेऊन ही जागा बिनविरोध निवडून द्यावी. काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी बारामतीमध्ये उमेदवार देऊ नये, अशी आमची भूमिका आहे. अजित पवार हे राज्यातील एक मोठे नेते होते. त्यांच्या विमान अपघाताची सीबीआयमार्फत सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी करत याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र पाठवले असल्याचेही यावेळी सांगितले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५६.०० क्विंटल | १,९२३ | २,६०१ | २,२४४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६१.५० क्विंटल | १,७०० | ४,२०० | ३,२१७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी:५५.०० क्विंटल | २,४०० | २,७५० | २,६३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ४,९०० | ५,०५० | ४,९९८ |

# २ लाखांपर्यंत कर्जमाफीचा मार्ग मोकळा?

## राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता; विविध निकषांवर सखोल छाननी सुरू

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मोठी घडामोड घडत असून, यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल येत्या महिनाभरात राज्य सरकारकडे सादर होणार आहे. त्यामुळे दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीच्या निर्णयाला गती मिळण्याची चिन्हे आहेत. समितीच्या सदस्यांकडून सध्या अभिप्राय मागविण्याची प्रक्रिया सुरू असून, लवकरच यावर अंतिम बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीनंतर अहवाल अंतिम करून तो सरकारकडे सुपूर्द केला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केली होती. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा करण्यात आली आहे. यासाठी माजी सनदी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. कर्जमाफीचा लाभ देताना राज्य सरकार कोणतीही घाई न करता सर्वंकष माहितीच्या आधारे निर्णय घेणार आहे. सहकार विभागाकडून विविध महत्त्वाच्या बाबींची माहिती गोळा केली जात आहे. यामध्ये विविध योजनांतील लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या, शेतकऱ्यांकडे असलेली जमीन व तिचा पिकांसाठी वापर, केंद्र व राज्याच्या अनुदानाचा लाभ घेतलेले शेतकरी, अतिवृष्टीमुळे मदत मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या, साखर कारखान्यांना ऊस पुरवणारे व नियमित एफआरपी मिळणारे शेतकरी, या सर्व घटकांचा विचार करून कर्जमाफीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राज्यातील आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही कर्जमाफी महत्त्वाची ठरणार असून, अहवालानंतर प्रत्यक्ष ▶▶ पान २ वर

# बीडसह सहा जिल्ह्यातून जाणार लातूर–कल्याण नवा महामार्ग





बीड–लातूर । प्रतिनिधी

**लातूर – कल्याण या नव्या महामार्गासाठी शासनाने प्रस्ताव केला असून, धाराशिव जिल्ह्याने अनुमती दिली आहे. मात्र बीड जिल्ह्यात काहीसा विरोध झाल्यानंतर राज्य रस्ते महामंडळाने नवीन प्रस्ताव सादर केला असून त्याला याच महिन्यात मान्यता मिळण्याची शक्यता आहे. लातूर – कल्याण हा ४५० किमी लांबीचा महामार्ग बीडसह सहा जिल्ह्यातून जाणार आहे. या नव्या महामार्गामुळे मराठवाड्यातील उद्योगाला चालना मिळण्याची शक्यता आहे.**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मुंबई आणि ठाण्याहून लातूरला केवळ ५ तासांत पोहोचण्यासाठी कल्याण – लातूर जनकल्याण महामार्ग प्रकल्पाचे सरेखन यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. हा ४५० किलोमीटर लांबीचा महामार्ग ठाणे, पुणे, अहिल्यानगर, बीड, धाराशीव आणि लातूर अशा सहा जिल्ह्यांतून जाणार आहे. प्रवासाचा वेळ १२ तासांवरून ५ तासांवर आणण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प हाती घेण्यात आला असून, एप्रिल २०२६ च्या पहिल्या आठवड्यात त्याचा अंतिम प्रस्ताव राज्य ▶▶ पान २ वर

# शिक्षकांचे भविष्य अधांतरी राज्यातील बाराशे शाळा अपात्र



मुंबई / पुणे । प्रतिनिधी

**कायम विनाअनुदानित तत्त्वावर सन २००० मध्ये मान्यता दिलेल्या मात्र मूल्यांकनात वारंवार अपात्र ठरलेल्या राज्यातील १२५२ शाळा आणि ८२७ तुकड्या शासनाने कायमस्वरूपी अपात्र केल्या असून त्यांची मान्यता रद्द केली जाणार असल्याचे खात्रीलायक वृत्त असून याबाबतचा शासन निर्णय झाल्याने शिक्षकांचे भविष्य अधांतरी झाले आहे.**

राज्यातील जवळपास ६ हजारांवर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना सन २००० या वर्षात कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता देण्यात आली होती. तथापि, ज्या शाळांचा कायम शब्द वगळला, अशा शाळांचे मूल्यांकन होऊन अनेक शाळा आज ▶▶ पान २ वर

### अशा आहेत अपात्र शाळा

प्राथमिक- ४३३(शाळा), ३३ (तुकड्या). माध्यमिक- ३२४(शाळा), ४१२(तुकड्या). उच्च माध्यमिक- ५०५ (शाळा), ३८२(तुकड्या). एकूण -१२५२(शाळा), ८२७ (तुकड्या).

# खरात प्रकरणात ईडीची एन्ट्री

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. राहुरी आणि बारामतीच्या पोटनिवडणुकीवरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध की नाही? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. तसेच दुसरीकडे अशोक खरात प्रकरणात आता ईडीची एन्ट्री होण्याची शक्यता आहे. या संदर्भातील संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. दरम्यान, सीडीआर लीक प्रकरणी दमानियांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

अशोक खरातला कोणी किती कॉल केले? याबाबत अंजली दमानिया यांनी गंभीर आरोप केले होते. या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीसांनी मोठं भाष्य केलं. फडणवीस म्हणाले की, "अशोक खरात प्रकरणातील सीडीआर कोणालाही ▶▶ पान २ वर

# पेट्रोल, डिझेलचे दर स्थिर!

## बुकिंगच्या आडून सरकारी तेल कंपन्यांकडून लूट; इंडियन पेट्रोलियम डीलर्सचा आरोप

मुंबई । प्रतिनिधी

पेट्रोल, डिझेलचे दर स्थिर पण आगाऊ बुकिंगच्या आडून सरकारी तेल कंपन्याकडून लूट केली जात असल्याचा आरोप इंडियन पेट्रोलियम डीलर्स संघटनेने केला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती केंद्र सरकार ठरवते. ▶▶ पान २ वर



# महाराजांच्या पुतळ्यासाठी अंधाराचा आधार कशाला!

बीड। सुभाष चौरे

**छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका धर्माचे किंवा जातीचे नसून ते अवघ्या मानवतेचे प्रेरणास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. मात्र, अलिकडच्या काळात रात्रीच्या अंधारात पुतळे बसवण्याचे जे फॅड सुरू झाले आहे, त्यावरून निर्माण होणारे वाद क्लेशदायक आहेत. पुतळा हा केवळ दगड, माती किंवा धातूचा नसतो; तो एका महान विचारांचे प्रतीक असतो. महाराजांनी नेहमी उजळ माथ्याने शत्रूचा सामना केला, मग त्यांच्या पुतळ्यासाठी अंधाराचा आधार का घ्यावा? सर्व संमतीने वाजत गाजत अनावरण झालेले कोणाला आवडणार नाही.? पुतळ्यावरून वाद नाही तर त्यांच्या विचारावरून संवाद व्हायला हवा आणि तोच महाराष्ट्र आपणाला हवा आहे.**



मागील काही वर्षांपासून राज्यातील वातावरण अगदी गढूळ झालेले आहे. जो तो आपल्या सोईनुसार त्याचा फायदा घेत असल्याचे दिसत आहे. प्रत्येक जाती जातीत द्वेष निर्माण करणारे काही कमी नाहीत. या राज्यात गुण्यागोविंदाने राहणारे समाज आज दुसऱ्या समाजाला पाण्यात पहाताना दिसत आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील चिखल, धाराशिव जिल्ह्यातील कळंब- वाशी आणि सोलापूर जिल्ह्यातील अंजनगाव यासह अन्य काही ठिकाणी महाराजांच्या पुतळ्यावरून समाजासमाजात वाद झाले. महाराजाच्या पुतळ्याला विरोध असण्याचे कारणच नाही, पण जिथे वाद होईल अश्याच ठिकाणी रात्रीचे पुतळे उभा केले जातात हे योग्य आहे असे कोणी म्हणणार नाही, योग्य म्हणणारेही आहेत पण त्यांना सामाजिक सलोखा नको आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी शून्यातून ▶▶ पान २ वर

**नियम आणि सन्मान**

पुतळा बसवताना सर्व कायदेशीर परवानग्या घेऊन, दिवसाढवळ्या आणि सर्व समाजाला सोबत घेऊन त्याचे अनावरण व्हावे. तो सोहळा अभिमानाचा असावा, भीतीचा नाही.

**विचारांचे संवर्धन**

महाराजांचे गडकिल्ले आज ढासळत आहेत. पुतळ्यावर लाखो रुपये खर्च करण्यापेक्षा, त्यांनी बांधलेल्या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आणि त्यांच्या इतिहासाच्या प्रचारासाठी तरुणांनी एकत्र यावे.


**शिक्षण आणि आरोग्य**

रयतेचे कल्याण हा महाराजांच्या प्रशासनाचा मुख्य गाभा होता. त्यांच्या नावाने वाचनालये, रुग्णालये किंवा गरजू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करणे हा पुतळा बसवण्यापेक्षा खरा मोठा सन्मान ठरेल.

**संवाद हाच मार्ग**

कोणत्याही वादावर चर्चा करून मार्ग निघू शकतो. प्रशासनानेही लोकभावना समजून घेऊन प्रलंबित परवानग्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि जनतेनेही कायद्याचे पालन करावे.

# शबरीमला प्रकरणी उद्यापासून सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी



तिरूअनंतपूरम । वृतसंस्था

**केरळमधील शबरीमला मंदिर प्रवेश प्रकरणावर आता सर्वोच्च न्यायालयात ९ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर ७ एप्रिलपासून अंतिम सुनावणी होणार आहे. ही सुनावणी केवळ शबरीमला मंदिरापुरती मर्यादित नसून, धार्मिक स्वातंत्र्य, महिलांचे अधिकार आणि समानता यांसारख्या महत्त्वाच्या घटनात्मक प्रश्नांवरही त्यात उहापोह करणार आहे.**

या खंडपीठाचे नेतृत्व सरन्यायाधीश सूर्यकांत करणार असून न्या. बी. व्ही. नागरत्ना, न्या. एम. एम. सुंदरेश, न्या. अहसानुद्दीन अमानुल्ला, न्या. अरविंद कुमार, न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह, न्या. प्रसन्न बी. वराळे, न्या. आर. महादेवन आणि न्या. जॉयमाल्या बागची यांचा समावेश आहे. शबरीमला मंदिरात १० ते ५० वयोगटातील महिलांना प्रवेशबंदी होती. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही बंदी रद्द करत सर्व वयोगटातील महिलांना मंदिरात प्रवेशाची परवानगी दिली होती. मात्र या निर्णयाचे देशभरातून स्वागत आणि विरोध झाला. निर्णयाविरोधात २०१९ मध्ये अनेक पुनर्विलोकन याचिकाही दाखल करण्यात आल्या. २०२० मध्ये या मुद्द्यांवर सुनावणीसाठी ९ न्यायाधीशांचे खंडपीठ स्थापन करण्यात आले होते. आता ७ एप्रिलपासून या प्रकरणाची अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. शबरीमला प्रकरण हे ▶▶ पान २ वर



अग्रलेख

# शेती, शहर आणि शासनव्यवस्थेसमोर दुहेरी आव्हान

निसर्ग हा मूलत: लहरी आहे, हे आपण मान्य करतो. पूर्वीही अवकाळी पाऊस पडत असे; परंतु अलीकडच्या काळात त्याची वारंवारता आणि तीव्रता ज्या पातळीवर वाढली आहे, ती चिंताजनक आहे. महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेला वादळी वाऱ्यासह गारपिटीचा पाऊस हा केवळ हवामानातील बदल नसून, तो शेती, पर्यावरण आणि मानवी जीवनावर घोंगावणारा मोठा धोका आहे.

पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ अर्ध्याहून अधिक राज्य या अवकाळीच्या विळख्यात सापडले आहे. एक लाख २२ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिकांचे नुकसान ही केवळ आकडेवारी नसून, हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर आलेला घाला आहे. रब्बी हंगामातील कांदा, गहू, हरभरा, मका, ज्वारी यांसारखी पिके काढणीच्या उंबरठ्यावर असताना निसर्गाच्या या अवेळी कोपाने त्यांना अक्षरश: मातीमोल केले. आंबा, द्राक्षांसारख्या बागायती पिकांचे झालेले नुकसान तर दीर्घकालीन आर्थिक फटका देणारे आहे.

शेती हा आधीच अस्थिर आणि जोखमीचा व्यवसाय बनला आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभावाची अनिश्चितता, साठवणूक व प्रक्रिया यंत्रणेचा अभाव आणि त्यात नैसर्गिक आपत्ती या सगळ्यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडत आहे. अवकाळी पावसामुळे निर्माण होणारे नुकसान ही फक्त एका हंगामापुरती मर्यादित बाब नसून, ती पुढील पेरणी, कर्जफेड आणि संपूर्ण आर्थिक चक्रावर परिणाम करणारी साखळी आहे. परिणामी, शेतीपासून दुरावणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जाते.

हवामानातील बदल हा या सर्व घडामोडींचा मुख्य घटक आहे. ऋतूचक्रातील बिघाड आता स्पष्टपणे जाणवू लागला आहे. पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा या तीन ऋतूंचा समतोल ढासळल्याने शेतीचे नियोजन कोलमडते आहे. मे महिन्यात सुरू होणारा पाऊस, एप्रिलमधील गारपीट किंवा अनियमित तापमान हे सर्व संकेत गंभीर आहेत. हवामान विभागाने पुढील काळातही पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे उन्हाळा जरी काहीसा सौम्य वाटला, तरी त्यामागे लपलेले संकट अधिक भीषण आहे.

या पार्श्वभूमीवर केवळ मदतीच्या घोषणा करून चालणार नाही. शासनाने तातडीने आणि प्रभावीपणे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देणे आवश्यक आहे. पंचनामे, कागदपत्रांची अडचण आणि निधी वितरणातील विलंब या जुनाट समस्यांवर मात करून थेट, पारदर्शक आणि जलद मदत पोहोचविण्याची गरज आहे. पिकविमा योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करणे, हवामान-आधारित विमा योजना मजबूत करणे आणि शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर पीकपद्धतीत बदल, हवामानाशी सुसंगत वाणांची निवड, जलव्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाचा वापर यावर भर देणे अत्यावश्यक आहे. 'क्लायमेट रेजिलियंट' शेतीकडे वळल्याशिवाय या संकटावर दीर्घकालीन उपाय मिळणार नाही. अवकाळीचा फटका केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिलेला नाही. शहरांमध्येही त्याचे भीषण परिणाम दिसून येत आहेत. पुण्यासारख्या विकसित शहरात काही तासांच्या पावसाने रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले, वाहतूक ठप्प झाली, वाहने वाहून गेली. हे चित्र नियोजनाच्या अपयशाचे द्योतक आहे. निसर्गावर शिक्का मारून जबाबदारी झटकणे सोपे असले, तरी शहर नियोजनातील त्रुटी, नालेसफाईतील ढिलाई आणि अनियंत्रित बांधकामे हीच या आपत्तीची खरी कारणे आहेत.

म्हणूनच, अवकाळी पावसाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता, तो एक व्यापक व्यवस्थात्मक संकट आहे, असे मान्य करावे लागेल. शेती आणि शहर दोन्ही क्षेत्रांमध्ये नियोजन, अंमलबजावणी आणि जबाबदारी यांची नव्याने मांडणी करावी लागेल.

आज बळीराजा अडचणीत आहे, तर शहरातील नागरिकही असुरक्षित आहेत. या दोघांच्याही संरक्षणासाठी शासनाने तातडीने, ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना राबवणे अपरिहार्य आहे. अन्यथा, अवकाळीचा हा कहर केवळ एक बातमी न राहता, भविष्यातील भीषण वास्तव ठरू शकतो.

## गवळीबंधूंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**वडवणी प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथील समाजभूषण युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वडवणी ज्ञानदीप गुरूकुल वडवणी येथे शैक्षणिक शालेय साहित्य वाटप व बीड येथील जिव्हाळा अनाथ आश्रम येथे खाऊ वाटप करण्यात आले आहे.**



दिवसेंदिवस वाढदिवस करण्याच्या पद्धती आपण बदलताना पाहत आहोत परंतु या गोष्टींना बाजूला ठेवून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय साहित्य वाटप केले असे नवीन उपक्रम युवकांनी राबवले पाहिजे असे प्रतिपादन ज्ञानदीप गुरुकुल चे संचालक श्री ढेरे सर यांनी केले आहे. उपक्रम राबवणाऱ्या युवकाला परिसरातील माणसांनी जपले पाहिजे या कार्यक्रमाला ज्ञानदीप गुरुकुल चे संचालक ढेरे सर युवा उद्योजक गणेश सुरवसे युवा नेते दत्ता गवळी गणेश काळे इत्यादी उपस्थित होते वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे .राजकीय नेते सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर पत्रकार वकील व्यापारी तसेच त्यांच्या मित्र परिवाराने त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या पत्रकार अंकुश गवळी यांनी पत्रकारितेत आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे त्यांच्या निर्भीड आणि सत्य न्यायाच्या मार्गावर चालत त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली त्यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरातून शुभेच्छा संदेश फोन कॉल आणि सोशल मिडियावर पोस्टच्या माध्यमातून त्यांच्या शुभेच्छा चा वर्षाव होत आहे. अनेक मान्यवरांनी त्यांच्याबद्दल कौतुक केले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज नेत्यांनी त्यांना शुभेच्छा देताना त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. तसेच सामाजिक संस्थाचे कार्यकर्ते विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित त्यांना शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी सत्कार समारंभ व सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्यात आला आहे. यावेळी गुरूकुल चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोघांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहे.

## माजलगावात आज १८.७७ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ

### कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव शहरासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्र व ४ उंच जलकुंभांच्या भूमिपूजनाचा समारंभ आज सोमवार,दि.०६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता पार पडणार आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमास जलशुद्धीकरण केंद्र-बीड रोड येथे उपस्थित राहण्याचे आवाहन नगराध्यक्ष सौ.शिफा बिलाल चाऊस,मुख्याधिकारी सुंदर बोंदर, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी केले आहे.**



पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्र व जलकुंभांचे भूमिपूजन आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते पार पाडणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे भूषवणार आहेत.यावेळी छ.स.साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन मोहन जगताप,माजी आ. मोहनराव सोळंके,माजी आ.डी.के. देशमुख यांची विशेष उपस्थिती असणार आहे.तर प्रमुख उपस्थितीमध्ये जयसिंग सोळंके, नारायण डक,जयदत्त नरवडे, बबनराव सरवदे,शेख जमीर आतार,संभाजी शेजुळ,विश्वंभर थावरे,शकील कुरेशी,सय्यद नाझीम असणार आहेत.दरम्यान जलशुध्दीकरण केंद्र १०.०० एमएलडी,एमबीआर जलकुंभ १४.४० लक्ष लिटर,सलोह जलकुंभ मंजरथरोड १०.५६ लक्ष लिटर, सलोह जलकुंभ मंगलनाथ कॉलनी ०९ लक्ष लिटर,सलोह जलकुंभ शासकीय गोडाऊनजवळ १० लक्ष लिटर,सलोह जलकुंभ जुना मोंढा, माजलगाव.०९ लक्ष लिटर कामाचे भूमिपूजन होणार आहे.या योजनेसाठी शासनाने तब्बल १८.७७ कोटी रुपयांची मंजुरी दिली असून,शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागनार आहे.या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार असून,चार उंच जलकुंभांद्वारे नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा केला जाणार आहे. शहराच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे नगराध्यक्षा शिफा बिलाल चाऊस,मुख्याधिकारी सुंदर बोंदर,उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, यांनी सांगितले असून कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेला प्रतिसाद

### जयभीम महोत्सवाच्या संयोजन समितीचे सुयोग्य नियोजन

**बीड । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड यांच्या वतीने (दि. ५) एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत 'जयभीम महोत्सव' उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने शहरातील तुलसी संगणक महाविद्यालय येथे रविवारी (दि. ५) एप्रिल रोजी आयोजित महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी उप शिक्षणाधिकारी नानभाऊ हजारे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रविण तरकसे, रेखा निर्मळ, कल्याण भांडारे उपस्थित होते. सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून तालुका स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत तब्बल ७८० विद्यार्थ्यांनी चाळणी परीक्षेत सहभाग नोंदविला होता. त्यापैकी पात्र ठरलेल्या ११० विद्यार्थ्यांची अंतिम फेरी रविवारी पार पडली. अंतिम स्पर्धेत कार्तिकी अनाप हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक भार्गवी तुपे व वैष्णवी थोरात यांनी मिळविला, तर तृतीय क्रमांक स्वरा भांडेकर आणि यश जावळे यांनी मिळविला. स्पर्धेचे परीक्षण प्रा.प्रशांत मळेकर, प्रा. सुनिल मोरे,प्रा. अनिल जरे, प्रा.अशोक सवासे,आप्पासाहेब कांबळे, जितेश उगलमुगले यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धा समिती प्रमुख प्रा. शशिकांत जावळे यांनी केले, तर सूत्रसंचालन महादेव इनकर यांनी तर आभार प्रा.नारायण घोलप यांनी केले. महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख मनोज वाघमारे, सुमेध जोगदंड, अशोक ठोकळ, प्रणित सरवदे, ॲड राजेश शिंदे, किरण निसर्गंध, प्रा. प्रकाश ढोकणे, पी.डी. जावळे ,निलेश तरकसे , चंद्रकांत साळवे, प्रा. प्रकाश ढोकणे आदींनी मोलाचे योगदान दिले. दरम्यान यावेळी पूज्य भदंत विपश्यनाचार्य विनयरक्षित महाथेरो व पूज्य भिक्खू धम्मशील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे यांनी पुढील वर्षीपासून बक्षीस म्हणून २५ हजार रुपये व प्रथम तीन गटामधून येणारे ९ विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळाची भेट सहल देण्याचे त्यांनी जाहीर केले. जयभीम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

## ४ घाटाचा ताबा नसताना ठोकेदाराकडून वाळू उपसा सुरू जिल्हाधिकारी यांनी कारवाई करण्याची मागणी

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यातील पूर्णा नदीपात्रात सध्या वाळू उपशावरून मोठे रणकंदन माजले आहे. तालुक्यातील १२ पैकी ११ वाळू घाटांचे लिलाव झाले असून, त्यापैकी ७ घाटांतून अधिकृत उपसा सुरू आहे. मात्र, उर्वरित ४ घाट अद्याप ठेकेदारांच्या ताब्यात दिले नसतानाही तिथे अवैध उत्खननाचा पूर आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे. मंठा तालुक्यात वाळू पथक कर्मचारी अधिकारी फक्त झोपेचं सोंग घेत असल्याचे दिसून येत आहे यामुळे शासनाचा महसूल वसुलीवर परिणाम होत आहे. तसेच रात्रीच्या वेळी वाळू खाली करणे नेमाप्रमाणे बंद आहे. परंतु रात्रीच्या वेळी वाळू सुरू असल्याचे दिसून येत आहे.**

विशेष म्हणजे, मंठा तहसीलदार सुमन मोरे यांचे या प्रकाराकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष होत असून, राजकीय वरदहस्त असलेल्या माफियांनी चक्क चोरीच्या वाळूचे रिल्स सोशल मीडियावर व्हायरल करून प्रशासनाला आव्हान दिले. शासनाचा महसूल बुडाला असून पूर्णा नदीकाठच्या खोरवड, देवठाणा, उस्वद, कानडी, हनवतखेडा, लिबखेडा, पूर्णा पाटी, सासखेडा, इंचा, टाकळखोपा, दूधा, किर्ला, वाघाळा, पोखरी-केंधळे, भुवन आणि वझर सरकटे या गावांमधून



दररोज शेकडो ब्रास वाळूची चोरी होत आहे. स्थानिक वाहनधारक महसूल व पोलीस प्रशासनाला हाताशी धरून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवत आहेत. या महसूल बुडवणाऱ्या यंत्रणेवर कारवाई कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील देवठाणा-उस्वद आणि भुवन या घाटांवरून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नियमबाह्य उत्खनन केल्याचा ठपका असतानाही, महसूल विभागाने पुन्हा मे. माऊली कन्स्ट्रक्शन (कैलास बोराडे) यांना कानडी-उस्वद हा ८ हजार४८१ ब्रासचा घाट ताबा दिलाच कसा ? एवढेच नव्हे तर, त्यांचे नातेवाईक सतीश सरकटे यांनाही टाकळखोपा-किर्ला घाटाचा ताबा १७ मार्च रोजी देण्यात आला आहे. या 'मेहेरनजर'मुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, आगामी काळात मोठ्या वादाची चिन्हे दिसत आहेत. वाळू उपशावरून सुरू असलेल्या या वादाला निसर्गाचीही साथ मिळेनाशी झाली आहे. टाकळखोपा-किर्ला घाटाचा ताबा मिळताच खडकपूर्णा धरणातून पाणी सोडल्याने घाट जलमय झाला, तर कानडी-उस्वद घाटात अवकाळी पावसामुळे वाहतुकीचा रस्ता वाहून गेला. वादग्रस्त ठेकेदारांच्या या स्थितीमुळे परिसरात 'नकटीच्या लग्नाला सतरा विघ्न' अशी चर्चा रंगत आहे.लिलावाचा ताळेबंद: एकूण घाट: १२लिलाव झालेले: ११सध्या सुरू असलेले: ७ ताब्यात न दिलेले: ४ अपेक्षित एकूण उपसा: ७५हजार ब्रास दहशत आणि बाऊन्सरचा वापर देवठाणा-उस्वद घाटावर ठेकेदार आणि स्थानिक वाहनधारकांमध्ये गुन्हे दाखल होण्यापर्यंत वाद विकोपाला गेले आहेत. परिस्थिती इतकी चिघळली आहे की, चक्क ४ महिला बाऊन्सर या घाटावर तैनात कराव्या लागल्या होत्या. तरीही वाद शमण्याचे नाव घेत नाहीये. सध्या हा घाट बंद आहे.

## पान १ वरून...

### २ लाखांपर्यंत कर्जमाफीचा

अंमलबजावणी कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महिनाभरात अहवाल सादर झाल्यानंतर सरकारकडून मोठा निर्णय अपेक्षित असून, लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---------------

### शिक्षकांचे भविष्य अधांतरी

टप्पा अनुदान घेत आहेत. मात्र, वारंवार संधी देऊनही ज्या शाळा अपात्र झाल्या आहेत त्यांना शासनाने कायमस्वरूपी अपात्र ठरवले असून या शाळांनी एक महिन्याच्या आत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यता घ्यावी किंवा मग ती शाळा कायमस्वरूपी बंद करण्यात येईल, असे शासनाने म्हटले आहे. तसेच या शाळांतील विद्यार्थ्यांचे नजीकच्या शाळेत समायोजन करण्याचाही निर्णय घेण्यात येणार आहे.पात्रता पूर्ण न करणाऱ्या शाळांबाबत शासनाने १ एप्रिल २०२६ रोजी एक कारवाई निश्चित केली आहे. एखादी शाळा सलग ३ वर्षे मूल्यांकनात अपात्र ठरल्यास त्या शाळेची मान्यता किंवा परवानगी रद्द होईल. या शाळांना स्वयं अर्थसहाय्यित अधिनियमातील तरतुदीनुसार शासन मान्यतेसाठी अर्ज करण्यास ३० एप्रिल २०२६ ही आता अखेरची मुदत देण्यात आली आहे. आज ना उद्या आपल्याला पगार मिळेल या भाबड्या आशेवर वीस वर्षांहून अधिक काळ विनावेतन सेवा देणाऱ्या हजारो शिक्षकांचे भविष्य या निर्णयाने मातीमोल झाले आहे. मानवी दृष्टिकोनातून या लोकांचे अनुदानित शाळेत समायोजन करावे, अशी मागणी होत आहे.

---------------

### बीडसह सहा जिल्ह्यातून जाणार

सरकारकडे मान्यतेसाठी पाठवला जाणार आहे. विशेष म्हणजे, महामार्गाच्या मार्गावरून बीड आणि धाराशीव या दोन्ही जिल्ह्यांमध्ये वाद निर्माण झाला होता. धाराशीववासीयांनी हा मार्ग त्यांच्या जिल्ह्यातून नेण्याची मागणी केली होती, तर बीडवासीयांनीही आक्रमक भूमिका घेतली होती. यावर एमएसआरडीसीने सुवर्णमध्य शोधत दोन्ही जिल्ह्यांना इंटरचेंज (अंतरबदल मार्ग) द्वारे या महामार्गाशी जोडण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रशासकीय पेच सुटला असून, वर्षानुवर्षे कागदावर असलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आता लवकरच प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यावर येणार आहे, ज्याचा मोठा फायदा मराठवाड्याच्या विकासाला होईल.

---------------

### पेट्रोल, डिझेलचे दर

मात्र, जागतिक बाजारपेठेतील घडामोडींवर ते अवलंबून असते. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वाढतील की नाही, हे सांगणे कठीण आहे. पेट्रोल आणि डिझेल पुरेसे असले तरी मागणी तितकाच पुरवठा होत आहे. अतिरिक्त साठा करू नका, असे आम्हाला सरकारकडून सांगण्यात आले आहे. पुरेसे इंधन ठेवण्याचा आमचा प्रयत्न असतो. मात्र, सरकारी तेल कंपन्याकडून इंधन पुरवठ्याच्या बुकिंगसाठी संबंधित कंपन्या या पंप ऑपरेटर्स आणि डीलर्सकडून एक दिवसाचे आगाऊ पैसे घेत असून करोडो रुपये बिनव्याजी वापरत आहेत. डीलर्सवर बंधने असली तरी सरकारी तेल कंपन्याकडून कमाई सुरू आहे. त्या आपला स्वार्थ साधत आहेत, असा आरोप कॉन्सॉर्टियम ऑफ इंडियन पेट्रोलियम डीलर्सचे (सीआयपीडी) राष्ट्रीय अध्यक्ष उदय लोध यांनी केला आहे.

**एक्सपी, पॉवर प्रकारच्या दरांत वाढ**

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये २६ मार्चपासून म्हणजे गेले १० दिवस पेट्रोलचे दर स्थिर आहेत. गेल्या २९ दिवसांपासून डिझेलच्या दरात वाढ झालेली नाही. मात्र, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) तसेच भारत पेट्रोलियम कंपनी लिमिटेड (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनी लिमिटेड (एचपीसीएल) या सरकारी तेल कंपन्यांनी मुंबईत एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला एक्सपी ९३ आणि पॉवर या प्रीमियम पेट्रोल व्हेरियंटच्या दरात प्रति लीटर २ ते २.३५ रुपयांनी वाढ केली आहे.

---------------

### खरात प्रकरणात

प्राप्त करून घेण्याचा अधिकार नाही. तो अधिकार फक्त ज्या तपास यंत्रणा आहेत त्यांनाच तो अधिकार आहे. मात्र, या प्रकरणातील सीडीआर लीक कसा झाला? तो सीडीआर कोणी लीक केला? या संदर्भातील चौकशी राज्य सरकार करणार आहे. मला असं वाटतं की अशा प्रकारच्या प्रकरणात फक्त आरोप-प्रत्यारोप करून चालत नाही. ज्यांच्या विरोधात सबळ पुरावा असेल त्यांच्यावर कारवाई होईलच. मात्र, कोण-कोणाशी बोललं या आधारावर आपली क्रिमिनल जस्टिस सिस्टम चालत नाही'', असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे. अशोक खरात प्रकरणाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना मोठं वक्तव्य केलं. अशोक खरात प्रकरणातील सर्व व्यवहारांची ईडी चौकशी होणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, ''खरात प्रकरणातील व्यवहारांबाबत नक्कीच ईडी चौकशी होणार आहे. त्याबाबत ईडीने या गोष्टीची माहिती घेतली आहे. ईडीनेही त्यांची कारवाई सुरू केलेली आहे. एकदा खरातच्या जमिनी कुठे-कुठे आहेत, याची माहिती समजली की नियमानुसार जे-जे करावं लागेल ते आम्ही करणार आहोत'', असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

-----------

### महाराजांच्या पुतळ्यासाठी अंधाराचा

स्वराज्य निर्माण केले. हे स्वराज्य निर्माण करताना त्यांनी रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका अशी आज्ञा दिली होती. ज्या राजाने आयुष्यभर नैतिकतेचे आणि शौर्याचे राजकारण केले, त्या राजाचे पुतळे आज प्रशासनाची नजर चुकवून, रात्रीच्या अंधारात बसवले जात आहेत, ही बाब गंभीर चिंतनाची आहे. पुतळा हा केवळ दगड, माती किंवा धातूचा नसतो; तो एका महान विचारांचे प्रतीक असतो. जेव्हा आपण रात्रीच्या वेळी छुप्या पद्धतीने पुतळा बसवतो, तेव्हा आपण नकळतपणे त्या महान व्यक्तिमत्त्वाच्या सन्मानाला धक्का लावत असतो. महाराजांनी नेहमी उजळ माथ्याने शत्रूचा सामना केला, मग त्यांच्या पुतळ्यासाठी अंधाराचा आधार का घ्यावा.? हा अनेकांना पडलेला प्रश्न आहे ज्या राजांनी तुम्हा आम्हाला सन्मानाने जगण्याचे शिकवले, त्यांच्या पुतळ्याचा सन्मान न राखणारा मला वाटत नाही महाराष्ट्रात कोणी असेल. उलट ढोल ताश्याच्या गजरात सन्मानाने पुतळ्याचे स्वागत करणारा सर्व जाती धर्मातील समाज आहे. मात्र पुतळे बसवण्याच्या घाईतून अनेकदा कायदेशीर प्रक्रियांकडे दुर्लक्ष होते. यामुळे दोन समाजात किंवा समाज आणि प्रशासन यांच्यात संघर्ष निर्माण होतो. नियमावली न पाळल्यामुळे पुतळे हटवण्याची वेळ येते, ज्यामुळे जनभावना दुखावतात. काहीवेळा पुतळ्याच्या जागेवरून श्रेयवादाची लढाई सुरू होते, ज्यामुळे गावागावातील सलोखा बिघडतो. अश्या वेळी भावनांना हात घालून राजकीय पोळी भाजण्याचे काम काही शक्ती करतात, ज्याचा फटका सर्वसामान्य जनतेला बसतो. छत्रपती शिवराय हे जोडणारे व्यक्तिमत्व होते, तोडणारे नाही. त्यांचे पुतळे हे प्रेरणेचे स्रोत असावेत, वादाचे केंद्र नाही. रात्रीच्या अंधारात पुतळे उभे करून सामाजिक तेढ निर्माण करण्यापेक्षा, त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या आचरणात आणणे हेच त्यांच्या आचार विचाराशी आपण पाईक असल्याची ओळख असेल. चला आपण मिळून असा महाराष्ट्र घडवूया, जिथे राजांच्या पुतळ्यावरून वाद नाही, तर त्यांच्या विचारांवरून संवाद होईल. ही अपेक्षा बाळगुयात.

---------

### शबरीमला प्रकरणी उद्यापासून

भारतातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि चर्चित प्रकरण आहे. जे केरळ राज्यातील शबरीमला अय्यप्पा मंदिरात महिलांच्या प्रवेशावर असलेल्या पारंपरिक बंदीशी संबंधित आहे. हे प्रकरण धार्मिक परंपरा, महिलांचे अधिकार आणि भारतीय संविधानातील समानतेचा हक्क यांच्यातील संघर्ष म्हणून ओळखले जाते. या प्रथेला कायदेशीर आव्हान देण्यात आले. १९९१ मध्ये केरळ उच्च न्यायालयाने ही बंदी योग्य असल्याचे सांगितले होते. मात्र कालांतराने ही प्रथा भारतीय संविधानातील समानतेच्या अधिकाराशी विरोधात असल्याचा मुद्दा पुढे आला. महिलांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या संघटना आणि काही याचिकाकर्त्यांनी या बंदीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

## पुरातन मंदिरासमोरील कुंडावर अतिक्रमण; ७० ग्रामस्थांचे निवेदन, प्रशासनावर प्रश्नचिन्ह

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचवण येथे असलेल्या पुरातन हेमाडपंथी (जोड महादेव) मंदिरासमोरील कुंड (बारव) व सभोवतालच्या जागेवर अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सुमारे ७० ग्रामस्थांनी प्रशासनाकडे निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली असतानाही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, आज या मंदिराच्या जतन, दुरुस्ती व संवर्धन कामांचे उद्घाटन माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके यांच्या हस्ते पार पडले. मात्र, अतिक्रमणाच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष करून उद्घाटन सोहळा पार पाडल्याने प्रशासन व लोकप्रतिनिधींवर ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, सुमारे दहा वर्षांपूर्वी तत्कालीन सरपंचांच्या कार्यकाळात काही व्यक्तींनी मंदिरासमोरील कुंड व मोकळ्या जागेची नोंद स्वतःच्या नावावर करून घेतली. त्यानंतर प्राचीन कुंड बुजवून त्या जागेवर घर बांधण्यात आले. याबाबत ग्रामस्थांनी विचारणा केल्यास संबंधितांकडून दमदाटी व आरेरावी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व पोलीस अधीक्षक कार्यालय, तसेच दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी तहसील कार्यालय येथे ग्रामस्थांनी निवेदन दिले होते. तरीही दीर्घ कालावधी लोटूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने संताप व्यक्त होत आहे. दि. १७ मार्च २०२६ रोजी पंचायत समितीने ग्रामपंचायतीस माहिती अद्ययावत करण्याचे आदेश दिले असले, तरी प्रत्यक्षात कारवाई अद्याप झालेली नाही. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मंदिरासमोरील अतिक्रमण प्रकरण गांभीर्याने घेऊन आमदार प्रकाश सोळंके यांनी स्वतः लक्ष घालावे, तसेच संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. चिंचवण ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक गणेश निर्मले यांनी ''प्रकरणाची चौकशी सुरू आहे'' अशी प्रतिक्रिया दिली. मात्र, इतका कालावधी उलटूनही कार्यवाही न झाल्याने संशय व्यक्त केला जात आहे. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने आता न्यायासाठी थेट न्यायालयात धाव घेण्याचा इशारा तक्रारदार लक्ष्मण कोठुळे यांनी दिला आहे. एकूणच, ऐतिहासिक वारसा असलेल्या मंदिर परिसरातील अतिक्रमणाचा प्रश्न गंभीर बनला असून, प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून तातडीने ठोस पावले उचलली जातील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात



जिल्हा सरकारी वकिल ॲड. अजय राख यांची तुकाराम मुंढे (सचिव महाराष्ट्र दिव्यांग कल्याण विभाग) यांच्या घरी सांत्वन भेट. दोन दिवसांपुर्वी मुंढे यांना मातृशोक झाला आहे. त्यामुळे सध्या ते त्यांच्या मूळ गावी ताडसोन्ना ईथे आहेत. यावेळी सहायक सरकारी वकिल अजय तांदळे, प्रभाकर आंधळे, ॲड. दगडखैर व ॲड. पठाण आदी उपस्थित होते.

### फळरोप वाटिकेतील मजुरांची प्रलंबित मजूरी द्या अन्यथा उपोषण -थोरात

माजलगाव । प्रतिनिधी



येथील कृषि चिकीत्सालय फळरोप वाटिका येथील प्रक्षेत्रावर काम करणा-या मजुरांची दि.१४ ऑगस्ट २०२२ ते १५ फेब्रुवारी २०२३ या कालावधतील मजुरी थकीत असुन ही मजुरी देण्यात यावी अन्यथा कृषी आयुक्तालय कार्यालय पुणे येथे दि.११ एप्रिल २०२६ पासुन अमरण उपोषण करण्याचा इशारा मजुर प्रतिनिधी गणेश थोरात यांनी निवेदनाव्दारे दिला आहे. सदर निवेदनावर बाबासाहेब पवार, तुकाराम निसर्गंध, महानंदा नवले, संजिवनी तंबुड, कमल भोपे, लोचना ढवळे, कुशिवर्ता मोरे, जिजाबाई सावंत, प्रयागा भोपे, उषा भोपे व मजुर प्रतिनिधी गणेश थोरात यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### मैं संपूर्ण क्रांती चाहता हूँ चा नारा; आझाद क्रांती सेनेची अंतरवाली टेंभी येथे संघटन उभारणी

माजलगाव । प्रतिनिधी

मैं संपूर्ण क्रांती चाहता हूँ या घोषवाक्याने प्रेरित होत आझाद क्रांती सेनेने जालना जिल्ह्यातील अंतरवाली टेंभी येथे आपली संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी शाखा रचना जाहीर करत सेनेने क्रांतिकारी विचारसरणीचा जोरदार संदेश दिला.



सेनाप्रमुख मा. राजेशजी घोडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली आणि जिल्हाप्रमुख दगडू घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंतरवाली टेंभी (ता. घनसावंगी, जि. जालना) येथे नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या शाखेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन, युवक सक्षमीकरण आणि अन्यायाविरोधात लढा देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. शाखा प्रमुख म्हणून फारुक शेख यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी पांडुरंग पाटोळे, सचिवपदी बंडू खरात, सहसचिवपदी राधाकिसन पाटोळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खजिनदार म्हणून कैलास घोडे, कार्याध्यक्ष म्हणून करण कारके, संपर्क प्रमुख म्हणून गणेश बर्डे तर संघटक म्हणून अहेमद शेख यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रसिद्धी प्रमुख म्हणून सतीश पाटोळे, सल्लागार म्हणून लिंबाजी कांबळे आणि सोशल मीडिया प्रमुख म्हणून अखिल शेख यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सदस्य म्हणून राहुल वाघमारे, बाबासाहेब पाटोळे, कृष्णा पुरुळे, सुरेश पाटोळे, सचिन कारके, विलास घायतडक, वसीम सय्यद, साहिल शेख, प्रकाश पाटोळे आणि रफिक सय्यद यांचा समावेश करण्यात आला आहे. या नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून आझाद क्रांती सेना सामाजिक न्याय, पारदर्शक व्यवस्था आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढा उभारणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संपूर्ण क्रांतीच्या दिशेने एक मजबूत पाऊल म्हणून या शाखेकडे पाहिले जात असून, स्थानिक स्तरावर या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे. या वेळीअशोक ढगे, किसन भिसे सर, तुकाराम जाधव, नवनाथ लोखंडे यांची ही प्रामुख्याने उपस्थिती होती.

# घाटनांदुर येथे आर्थिक व्यवहारातून ऊसतोड मुकदमाचे अपहरण

घाटनांदूर । प्रतिनिधी

येथून एका ऊसतोड कामगार मुकादमाचे आर्थिक व्यवहारातून वसुलीसाठी (ता.४) शनिवारी दुपारी १ वाजता अपरहण केल्याची घटना घडली असून अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात रात्री उशिरा अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे.



पोलिस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, साखर कारखान्याला ऊसतोड कामगार पुरविणारा ऊसतोड मुकादम बापूराव देवराव चव्हाण (रा. मुरंबी तांडा ता. अंबाजोगाई ह. मु. घाटनांदूर) यांचे आर्थिक वसुलीसाठी (ता.४) शनिवारी दुपारी एकच्या दरम्यान घरून मोटारसायकल क्र. एमएच ४४एसी ४५५६ घेऊन बाहेर गेल्यावर शासकीय गोदाम परिसरात असलेल्या विद्युत डी पी जवळ आले.

असताना त्यांच्या पाळतीवर असलेल्या पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून आलेल्या अंकुश हरिराम ढावरे (रा. होळ ता. केज) व इतर तीन जणांनी मिळून बापूराव चव्हाण यांना उचलून कार मध्ये टाकून अपहरण केल्याची घटना घडली. सदरील घटना चव्हाण यांच्या घराच्या शेजारी राहणारा सचिन रमेश शिंदे यांनी बापूराव चव्हाण यांच्या गंगाबाई बापूराव चव्हाण यांना सांगितल्यानंतर त्यांनी आपल्या मुलाना घेऊन अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. गंगाबाई चव्हान यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक असद शेख तपास करत आहेत.

# अण्णाभाऊंचा पुतळा हाटवल्यास आम्ही सरकार हटवू -आझाद क्रांती सेना

माजलगाव । प्रतिनिधी

५ एप्रिल २०२६ रोजी खामगाव जिल्हा बुलढाणा येथे सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा प्रकरणी आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी भेट देऊन झालेला सर्व प्रकार समजून घेतला. याप्रसंगी सेना प्रमुख राजेश घोडे म्हणाले की सरकार जाणीवपूर्वक अण्णाभाऊ साठेंना तुझ्या भावाची वागणूक देत आहे खामगाव नगरपालिका, आमदार, व मंत्री, हे भाजपा चे असून गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत भाजपाची सत्ता आहे तेव्हा भाजपमंत्राच्या बापाचा पुतळा बसवायचा असल्याने अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांना विरोध मंत्र्याकडूनच होत आहे तेव्हा अण्णाभाऊंचा पुतळा हटवण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्रातील मातंग समाजासह इतर समाजाला सोबत घेऊन आम्ही भाजपा सरकार हटवून टाकू असे मत याप्रसंगी सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले. समाजाच्या वतीने नगरपालिका हद्दीतील रेल्वे स्टेशनच्या शेजारील जागे मध्ये सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसवला असून गेल्या अनेक वर्षापासून अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाची मागणी समाजाच्या वतीने करण्यात येत आहे तेथील पुतळा नगरपालिका व पोलीस



प्रशासनाच्या माध्यमातून उचलण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने गेल्या पंधरा दिवसापासून समाजाच्या वतीने साखळी उपोषण करण्यात येत आहे. आज तेथे भेट देऊन खामगाव येथील सत्यशोधक अण्णाभाऊ यांच्या पुतळ्याला हार घालून आझाद क्रांती सेना या लढ्यामध्ये खंबीरपणाने उभा असल्याचा शब्द समाज बांधवांना देण्यात आला अण्णाभाऊंचा पुतळा हटवल्या सबंध महाराष्ट्र मध्ये आंदोलन उभा करण्याची शपथ आज या प्रसंगी घेण्यात आली. समवेत आझाद क्रांती सेना माजलगाव ता प्रमुख अशोक जी ढगे, आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटना माजलगाव ता प्रमुख तुकाराम जाधव, नवनाथ लोखंडे, आकाशात हातागळे, राहुल गायकवाड व समाज बांधव उपस्थित होते

# खो-खो राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाला सुवर्ण व कांस्यपदक

**'रवी दरगोंडा' सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू तर ''संभाजी मदन'' यांची सर्वोत्कृष्ट संरक्षक म्हणून निवड**

बीड । प्रतिनिधी

ओडिसा राज्यात आतागड कटक या ठिकाणी संपन्न झालेल्या खोखो इंडिया आयोजित अधिकृत राष्ट्रीय कुमार कुमारी १८ वर्षाखाली स्पर्धेत स्पर्धेच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या कुमार संघाने कर्नाटक संघावर रोमांचक विजय मिळवत अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा प्रेक्षणीय ठरला. अंतिम सामनात महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने कर्नाटक संघावर अटीतटीने मात करत सुवर्ण पदक मिळवले या सामन्यात दोन्ही संघांनी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. पहिल्या डावात महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही संघांनी ८-८ गुणांची बरोबरी साधली दुसऱ्या गावात दोन्ही संघाने जोरदार खेळकर १०-१० गुण मिळवले. त्यामुळे सामना बरोबरीत संपला आणि निकालासाठी अतिरिक्त डाव खेळवण्यात आला. अतिरिक्त डावात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी जबरदस्त आक्रमण करत १० गुणांची कमाई केली. कर्नाटक संघाला फक्त ९ गुणांची कमाई करता आली परिणामी महाराष्ट्राने अवघ्या एक गुणाच्या फरकाने हा थरारक सामना जिंकत अजिंक्यपद आपल्या नावावर कोरले. अंतिम सामन्यात रवी दरगोंडा आदेश मदन ओम दिवशे संभाजी मदन रोहित चारवंडे कार्तिक पवार रोहन महाजन आणि शिवदत्त दाभाडे यांनी संरक्षण व आक्रमण या दोन्ही विभागात अतिशय दमदार



कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाला प्रशिक्षक विभीषण पाटील (धाराशिव) यांचे मार्गदर्शन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून योगेश मोरे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. तसेच महाराष्ट्राचे समन्वयक सुरेश गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेत मुलांच्या गटात सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू म्हणून रवी दरगोंडा यांचा गौरव करण्यात आला तर सर्वोत्कृष्ट संरक्षक म्हणून संभाजी मदन याला सन्मानित करण्यात आले. दरम्यान महाराष्ट्राच्या मुलींच्या संघानेही उत्कृष्ट कामगिरी करत यजमान ओडिसा संघाचा पराभव करून कास्यपदक मिळवले मुलींच्या संघाकडून वैभवी मदन संतोषी शिंदे वैभवी मते या खेळाडूंनी प्रभावी खेळ करत संघाला विजय मिळवून दिला संघाला प्रशिक्षक म्हणून सचिन मोहिते (जालना)तर व्यवस्थापक म्हणून श्रीमती घनघन यांनी काम पाहिले. या दोन्ही संघांच्या यशामुळे सर्व खेळाडू प्रशिक्षक मार्गदर्शक व व्यवस्थापक यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे महाराष्ट्राच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि दर्जेदार कामगिरी करत अखेर विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. महाराष्ट्राच्या कुमार मुली संघांनी राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक व कांस्यपदकांची कमाई करत महाराष्ट्राची क्रीडा क्षेत्रात नावलौकिकत भर घातली आहे. महाराष्ट्र संघाच्या या पदक विजयी कामगिरिबद्दल शाहेद पटेल, प्रा डॉ तानाजी आगळे, सुरेश साळुंके प्रा. चित्राताई घोरपडे(आगळे), राष्ट्रीय खेळाडू तानाजी मेटे, रवि शिंदे, अनिल मोरे, वैभव कठाळे, विकास निकम यांनी अभिनंदन केले .

## पान ६ वरुन...

### संतभूमी अर्बनची आर्थिक

आर्थिक निर्देशकही समाधानकारक पातळीवर राखले आहेत. सीआरएआर १०.५० टक्के, एसएलआर २५.८० टक्के, सीडी रेशो ६०.८० टक्के आणि सीआरआर १.७० टक्के ही प्रमाणे संस्थेच्या मजबूत आर्थिक पायाभरणीचे द्योतक आहेत. संस्थेच्या व्यवस्थापनाने सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा पुरविण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील सभासदांना आर्थिक बळकटी देत समाजाच्या सर्वांगीण विकासात संस्थेची भूमिका अधिक प्रभावी ठरत आहे. संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व पिग्मी एजंट यांच्या एकत्रित आणि समर्पित प्रयत्नांमुळे ही यशस्वी वाटचाल शक्य झाली असून, भविष्यातही अधिक प्रगत सेवा आणि सभासदाभिमुख उपक्रम राबवण्याचा संस्थेचा दृढ संकल्प आहे.

### चौसाळा ग्रामपंचायतची

घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे सदर कचऱ्याबाबत संबंधित सरपंच यांना विचारणा केली असता डेपोसाठी जागा उपलब्ध नाही त्यामुळे अनेक ठिकाणी प्रयत्न करूनही जागा मिळत नाही मा. जिल्हाधिकारी यांना वारंवार पत्र निवेदन देऊनही जागा उपलब्ध होत नसल्याने कचरा गाडी बंद करण्यात आली आहे शासनाने कचरा डेपोसाठी तातडीने जागा उपलब्ध करून देण्यात यावे अशी मागणी सरपंच पती सामाजिक कार्यकर्ते प्रेमचंद (बाबू) शेठ लोढा यांनी मा. जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे.

### बीडमध्ये शिवसेना संघटन

लक्ष्मण बसवर यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेनेच्या उपतालुकाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. या प्रसंगी मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, चंद्रकांत नवले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.एकंदरीत, या भव्य कार्यक्रमातून बीड जिल्ह्यात शिवसेना संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार स्पष्टपणे दिसून आला.

२०२९ साठी पूर्ण ताकदीनिशी लढू- अनिलदादा जगताप

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रस्ताविकात बोलताना उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांसोबत संघटनात्मक बाबींवर सविस्तर चर्चा केली. तसेच येणाऱ्या काळात बीड जिल्ह्यात शिवसेना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. २०२९ हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून बीड जिल्हा शिवसेना पूर्ण ताकदीने काम करेल. प्रत्येक शिवसैनिकाने पक्षाच्या वाढीसाठी स्वतःला झोकून देणे आवश्यक आहे, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### आज माजलगावात भाजपा

देण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सौ. रुपालीताई कचरे (तालुकाध्यक्ष, किट्टी आडगाव मंडळ), डॉ. अभिजीत सोळंके (तालुकाध्यक्ष, पात्रुड मंडळ) व श्री. विनायक रत्नपारखी (तालुका अध्यक्ष माजलगाव शहर मंडळ) यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे.

### बीड सांगवीत पोलिस

आयोजन केले आहे.यावेळी बीड सांगवी प्रथम नागरिक नंदकिशोर करांडे,ह.भ.प.जालीधर महाराज नरवडे माजी सरपंच बबनराव करांडे, सेवा सोसायटी चेअरमन सुभाष तात्या गणगे,आमदार श्री सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहायक विकास तात्या साळवे, यासिन शेख, शिवदास नरवडे, रंजित ढोबळे, उत्तम देवकर, रामराम शेळके, हिराजी बावणे विठ्ठल शेळके, संदिप करांडे,विठ्ठल कणसे, लक्ष्मण दिवटे, संजय बावणे प्रशांत घुमरे, कल्याण मोहरकर, आसाराम पाटील,बारकु ढोबळे, महादेव चव्हाण, बाळासाहेब काका करांडे, राजाभाऊ चव्हाण ,जाकीर शेख, दिपक कासवा,आरेफ सय्यद, बंडा घुले, दिलीप गणगे, विजय धनवे, नामदेव जाधव,गोरख ढोबळे,विजय करांडे,विजय डुकरे, आशाताई करांडे, शोभाताई करांडे महादेव ढोबळे,हारी नरवडे, संतोष नरवडे, ललेश नरवडे, महावीर नरवडे, युवराज नरवडे,गोरख नरवडे,आदी उपस्थित ग्रामस्थांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या सुत्रसंचलन विकास तात्या साळवे यांनी केले आहे आभार प्रदर्शन पोपट करडुळे यांनी केले आहे.

# बंजारा ब्रिगेडची जिल्हा व तालुका कार्यकारिणी जाहीर अध्यक्ष राठोड यांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांच्या निवडी

बीड । प्रतिनिधी

बंजारा ब्रिगेड संघटनेची बीड जिल्हा आणि तालुका कार्यकारिणी शनिवारी (ता.०४) जाहीर करण्यात आली. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय विश्रामगृह येथे पार पडलेल्या बैठकीत या निवडीची घोषणा करण्यात आली. यावेळी



नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

बंजारा समाजाच्या न्याय हक्कासाठी लढा देणाऱ्या बंजारा ब्रिगेड संघटनेची ताकद वाढवण्यासाठी बीड जिल्ह्यात संघटनात्मक फेरबदल करण्यात आले. यामध्ये राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरील सक्रिय कार्यकर्त्यांना महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. प्रदेश प्रवक्ता अनिल राठोड (खोला), प्रदेश उपाध्यक्ष सतीश पवार (आमगोत) यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष योगेश पवार, बीड

जिल्हा सचिव प्रमोद राठोड, बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख विष्णू राठोड, सोशल मीडिया प्रमुख तुळशीराम जाधव तर गेवराई तालुकाध्यक्ष अमोल राठोड, गेवराई तालुका उपाध्यक्ष अंकुश राठोड, पोपट चव्हाण, गेवराई तालुका सचिव योगेश राठोड, तालुका संघटक विठ्ठल राठोड,तालुका सह-संघटक बाळू जाधव, गेवराई सोशल मीडिया प्रमुख बाळू पवार, विद्यार्थी आघाडी प्रमुख रमेश राठोड तसेच माजलगाव तालुकाध्यक्षपदी भानुदास जाधव यांची निवड करण्यात आली आहे. जातेगाव सर्कल प्रमुखपदी दत्ता राठोड, उपाध्यक्षपदी अविनाश पवार, तर सचिवपदी राहुल पवार यांची निवड झाली. गढी सर्कल प्रमुख म्हणून भास्कर राठोड यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निवडीनंतर बोलताना राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी समाजाच्या प्रश्नांसाठी आणि संघटनेच्या विस्तारासाठी तत्पर राहावे, असे आवाहन केले. निवडीबद्दल सर्व स्तरातून पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# ईट येथे गुगळादेवी यात्रेनिमित्त शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांची भव्य दिव्य मिरवणूक

बीड । प्रतिनिधी

दर वर्षी प्रमाणे गुगळादेवी मातेची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी होत असते गेली १० ते ११ वर्षापासून गुगळादेवी यात्रा निमित्त व भिक्षा कार्यक्रम निम्मित गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती महंत श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांची ईट ग्रामस्थांच्या वतीने भव्य दिव्य स्वागत मिरवणूक काढण्यात येते या हि वर्षी उत्साहात गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली

ढोल ताशा लेझीम वाजवत गावातील तरुण मंडळी, महिला मंडळी, लहान थोर भाविक भक्तांच्या उपस्थिती मध्ये



### पारंपरिक वाद्य, हरी नाम घोषाने गावकरी मंत्रमुग्ध

ईट फाटा ते ईट गाव या मार्गामध्ये सडा रांगोळी काढून हरी नामाच्या जय घोषात करत गावकऱ्यांच्या वतीने गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली

गुगळादेवी यात्रा निमित्त ईट गावातील हनुमान मंदिरात परिसरात मिरवणुकीचा समारोप करण्यात या ठिकाणी सर्व ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# धम्मदीप बुद्ध विहारात चैत्र पौर्णिमा उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

बौद्ध धम्मात प्रत्येक पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक महत्त्वपूर्ण घटना तथागतांच्या जीवनात पौर्णिमेलाच घडल्या आहेत. खडतर तपश्चर्या करूनही सिद्धार्थला दुःख मुक्तीचा मार्ग सापडला नाही. शरीर अस्थिपंजर झाले होते, त्यानंतर ते उरूवेलेला वटवृक्षाखाली ध्यानस्थ बसले असता सुजाता नावाच्या राजकन्यांनी त्यांना ह्याच चैत्र पौर्णिमेला तिची मनोकामना पूर्ण झाल्यामुळे सिद्धार्थला वनदेवता समजून खीर प्राशन करायची विनंती केली होती. त्या विनंतीनुसार सिद्धार्थाने खीर प्राशन केल्यानंतर त्राण प्राप्त झाले व पुढे गयेला पिंपळवृक्षाखाली ध्यानधारणा केल्यानंतर वैशाख पौर्णिमेला दिव्य ज्ञान प्राप्त झाले. तरी प्रत्येकाने तथागतानी सांगितलेल्या मार्गाचा जीवन जगण्याकरिता ध्यानधारणा, विपश्यना करणे, आपले मन जे राग, लोभ,द्वेष, अशांततेने भरले आहे ते शांती, प्रेम, मैत्री, करूणा दान करण्यास सतत प्रवृत्त राहील व आपल्या जीवनात तसे आचरण ठेवणे किती गरजेचे आहे व माणसाचा चेहरा हा अंतर्मनाचा आरसा आहे तरी अंतरमनात राग, लोभ, द्वेष, अशांततेची धूळ बसू न देता त्रिशरण,



पंचशील, अष्टांगिकमार्ग व दहा प पारमितींचे केवळ बुद्धविहारात जाऊन सामुदायिक वाचन न करता ते आपल्या जीवनात आचरण करून तथागताने सांगितलेल्या दुःखमुक्तीच्या मार्गावर चालण्याकरिता सतत प्रयत्नशील असले पाहिजे. ह्यातच सर्व मानव जातीचे कल्याण आहे असे तथागतच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगून धम्मदीप बुद्ध विहारात चैत्र पौर्णिमा निमित्त आयोजित वंदना प्रसंगी प्रशांत वासनिक यांनी प्रतिपादन केले. सर्वप्रथम तथागतास पुष्प व महामानवांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून दीप प्रज्वलीत करून सामुदायिक वंदना घेण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी प्रशांत वासनीक व सुजाता वासनीक या दांपत्याने इगतपुरी येथे दहा दिवसीय विपशना शिबिर करून आल्याबद्दल धम्मदीप बुद्ध विहार, महामानव अभिवादन ग्रुप बीड व वाचाल तर वाचाल वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा पुष्पगुच्छ भिमाई, भारतीयांचा राष्ट्रीय धर्म व नवी पहाट हा काव्यसंग्रह पुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त एलआयसी प्रबंधक यु.एस. वाघमारे तर प्रमुख पाहुणे म्हणून बौद्धाचार्य तथा समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले लाभले होते.

# जयभिम महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल!

## जयभिम महोत्सवाचा आनंद घ्यावा- संयोजन समितीचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

विश्वरत्न, बोधीसत्व, महामानव तथा राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध कार्यक्रमाने साजरी होत आहे. हा जयभिम महोत्सव रविवार (दि.५) एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत साजरा होत असून या महोत्सवात धम्मदेसना, व्याख्याने, आरोग्य, विद्रोही कवि संमेलन, रक्तदान शिबिरे, भिमगीत स्पर्धा, समता ज्योत मिरवणूक आदी विविध कार्यक्रमांची रेलचेल होणार आहे.




तरी या जयभिम महोत्सवाचा सर्वांनी आनंद घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

दरवर्षी विविध परिवर्तनवादी व सांस्कृतिक कार्यक्रमाने समाजाच्या स्वबळावर जयभिम महोत्सव साजरा केला जातो. यावर्षीही विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध परिवर्तनवादी कार्यक्रम हाती घेत साजरी होत आहे. या जयभिम महोत्सवाची सुरुवात रविवार (दि.५) एप्रिल पासून महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा व धम्मदेसना कार्यक्रम घेवून झाली आहे. हा जयभिम महोत्सव १४ एप्रिल पर्यंत चालणार असून या दहा दिवसांच्या कालावधीत विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. विशेषतः म्हणजे बीडच्या सार्वजनिक जयभिम महोत्सवाचे कौतूक अवघ्या महाराष्ट्राने केलेले असून हा जयभिम महोत्सव आदर्श व प्रेरणा घालून देणारा ठरलेला आहे. जयभीम महोत्सवातील सर्व कार्यक्रमांना उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

असे होणार कार्यक्रम

सोमवार दि.६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सकाळी १० ते ५ पर्यंत रक्तदान शिबीर, सायं ७ वाजता एका वादळाची सांगिनी:मी रमाई नाटिका, मंगळवार दि.७ रोजी दुपारी १२ वाजता महापुरुष वकृत्व स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता चेतन चोपडे यांचा भव्य संगीत रजनी कार्यक्रम, बुधवार दि.८ रोजी सकाळी ११:३० वाजता चित्रकला स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता प्रा.संदीप कदम यांचे व्याख्यान, गुरुवार दि.९ रोजी ११:३० वाजता विद्रोही कवि संमेलन, सायंकाळी ७ वाजता प्रा.जगदीश ओहोळ यांचे व्याख्यान, शुक्रवार दि.१० रोजी सकाळी ११:३० वाजता महिलांसाठी विविध स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता प्रा.विलास खरात यांचे व्यख्यान, शनिवार दि.११ रोजी सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत १८ तास अभ्यास( तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय), सकाळी ८ वाजता क्रांतिसूर्य महात्मा फुले अभिवादन रॅली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते महात्मा फुले पुतळा, सकाळी ११ वाजता भिमगीत गायन स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता कमलाकांत काळे यांचे व्याख्यान, रविवार दि.१२ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ८ पर्यंत भव्य नृत्य स्पर्धा सोमवार दि.१३ रोजी अनिरुध्द वनकर यांचा भव्य संगीत रजनी कार्यक्रम (सेवादल मैदान, बाजार तळ पेठ बीड),रात्री वाजता समता ज्योत, मंगळवार दि.१४ रोजी सकाळी अभिवादन रॅली ( सामाजिक न्याय भवन ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा), सायंकाळी ६ ते १२ छ.शिवाजी महाराज पुतळा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे.

# राज्यातील कृषी विद्यापीठांत इनक्युबेशन सेंटर

## कृषी क्षेत्रामध्ये एआय राबविण्याचा निर्णय, २०० कोटींची मान्यता

पुणे : 'महाॲग्री एआय' धोरणाअंतर्गत राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता आणि इनक्युबेशन केंद्रे स्थापन करण्यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधी खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने मागील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये घेतला होता. त्यासाठी ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली होती. मात्र यापैकी एक रुपयाचा निधीही या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी खर्च करण्यात आला नव्हता. याउलट, 'एआय फॉर ॲग्री' ही परिषद घेऊन तिच्यावर खर्च करण्याचे धोरण कृषी विभागाने अवलंबले होते. याबाबत 'ॲग्रोवन'मधून लेखाद्वारे वस्तुस्थिती प्रसिद्ध झाल्यानंतर विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन्ही



सभागृहांमध्ये याबाबत कृषी विभागावर टीकेची जोड उठवण्यात आली होती. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सभागृहात विभागाची पाठराखण केली असली तरी याबाबत बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केल्याचे समजते.या पार्श्वभूमीवर, कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाच्या अंमलबजावणीसाठी निधी वितरणास आता सुरुवात झाली आहे.

३१ मार्चला यासंदर्भातील शासन निर्णय काढण्यात आला. इनक्युबेशन केंद्राद्वारे औद्योगिक आणि कृषी क्षेत्राकडून कळविण्यात येणाऱ्या समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान विकसित करणे अपेक्षित आहे. विद्यापीठांच्या संशोधन कार्यास उपयुक्त ठरणारी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधने विकसित करणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नावीन्यता केंद्रामार्फत निवडलेल्या नावीन्यता प्रकल्पांचे या केंद्रामार्फत इनक्युबेशन करण्यात येईल. या केंद्रांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांसोबत भागीदारी अनिवार्य आहे.

# सुपीक जमिनी उद्योगांच्या घशात जाऊ देणार नाही: विजय वडेट्टीवार




गडचिरोली : जिल्ह्यात उद्योगांच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी बळकावण्याचे षड्यंत्र सुरू असून या प्रक्रियेत सत्ताधारी भाजपशी संबंधित नेत्यांची भागीदारी असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकारला कडक इशारा दिला की, शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय एक इंचही जमीन अधिग्रहित करू देणार नाही.

वडेट्टीवार म्हणाले, की गडचिरोली जिल्ह्याचा ६९.९ टक्के भाग जंगलाने व्यापलेला आहे. केवळ ३० टक्के जमीन शेती आणि वसतीसाठी उपलब्ध असताना, आता चामोर्शी तालुक्यातील १४ गावांमधील सुपीक जमीन अधिग्रहित केली जात आहे.

आगामी काळात आणखी ३३ गावे या प्रक्रियेत येणार असून, यामुळे सुमारे ५० गावे ओसाड पडू शकतात तसेच हजारो शेतकरी भूमिहीन होऊ शकतात. एमआयडीसीसाठी शेतकऱ्यांना प्रति एकर केवळ ५ ते ८.५ लाख रुपये दिले जात आहेत, जो अत्यंत कमी मोबदला आहे. उद्योगांना आमचा विरोध नाही.

नवीन उद्योग यावेत, विकास व्हावा पण त्यासाठी शेतकऱ्यांची सुपीक जमीन न घेता पडीक जमिनीवर उद्योग उभारावेत. लोहखनिज वाहतुकीमुळे जिल्ह्यात २०० हून अधिक निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे, तरीही मृतांच्या नातेवाइकांना कोणतीही मदत मिळालेली नाही.

आदिवासींच्या जमिनी भाडेतत्त्वावर घेऊन त्यांच्या मूळ संस्कृतीला धक्का लावण्याचे काम सुरू आहे.गडचिरोली जिल्ह्याला मायनिंगमधून मिळणारा ४०० ते ४५० कोटींचा महसूल जातो कुठे, तो जनतेच्या कल्याणासाठी वापरला जातो का, असे प्रश्न उपस्थित करत जर सरकारने बळजबरीने जमिनी घेतल्या तर काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीनिशी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहील आणि तीव्र आंदोलन करेल, असा इशारा वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत दिला.

# पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्लूला रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

'बर्ड फ्लू' हा एक संसर्गजन्य रोग असून तो सर्व प्रकारचा पक्षांमध्ये संक्रमित होतो. हा रोग एच ५ एन १ या विषाणूमुळे होतो.

बर्ड फ्लूची लक्षणे : प्रथमता कोंबड्यांचे खाणे पिणे बंद होऊन ते सुस्तावतात. नाकातोंडातून रक्त मिश्रित श्राव बाहेर येतो. तोंडाचा व डोक्याचा भाग सुजलेला दिसतो. डोळ्याच्या पापण्याच्या आतील भाग लाल होतो वा सुजलेला दिसतो. विष्ठा हिरव्या रंगाची होते व पायांना सूज येते. पक्षी चालताना अडखळतात. पंख विखूरतात व गळतात. पक्षी निस्तेज दिसतात. अंडी उत्पन्न कमी होते. श्वसनाचा त्रास होतो, शिंका येतात व श्वास घेताना घर घर आवाज येतो. श्वास घेण्यास अडथळा येऊन पक्षी दगावतात.

प्रतिबंधात्मक उपाय : बर्ड फ्लूने नियंत्रित जैव सुरक्षाविषयक उपाययोजनांचे कडकपणे पालन केले गेले पाहिजे. पक्षी सध्या संक्रमित नसले तरी सर्व कुकुट पालकांनी आपल्या फार्मवर प्रतिबंधात्मक उपाय केले पाहिजेत.

कुक्कुटपालनात एक समान वयोगटाचे पक्षी पाळण्याचे धोरण अवलंबावे याला 'ऑल इन' 'ऑल आउट' उत्पादन प्रणाली म्हणतात. यात एक दिवसाची पिल्ले आणून ती सर्व एकाच दिवशी विकायची. देशी, बॉयलर आणि अंडी देणारे पक्षी जंगली किंवा स्थलांतरित पक्षांच्या संपर्कात येऊ देऊ नयेत. वन्य पक्ष्यांचा वावर असलेल्या व त्यांच्यामुळेच दूषित होण्याची शक्यता असलेल्या पाण्याच्या कोणत्याही स्त्रोतापासून कोंबड्यांना दूर ठेवावे फार्मवर जंगली पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करू नये. केवळ आवश्यक कामगार आणि वाहनांना फार्मवर प्रवेश करण्याची परवानगी द्यावी.

फार्मवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वच्छ कपडे आणि निर्जंतुकीकरण याच्या सुविधा पुरवाव्यात फार्मवर प्रवेश करताना व बाहेर पडताना उपकरणे आणि वाहने पूर्णपणे स्वच्छ आणि निर्जंतुक करावे. फार्मच्या कंपन्यातील गेटवर वाहन निर्जंतुकीकरणासाठी व्हेईकल डीप तयार करावे. त्यात पोटॅशियम परमॅग्नेट चे द्रावण भरलेले असावे. फार्म वर येणाऱ्या सर्व वाहनांचे त्या द्रावणातून येतील ते पहावे. संक्रमित परिसरात विषाणूचे प्रमाण कमी होण्याकरिता सोडियम हायपोक्लोराइड दोन टक्के केव्हा फॉर्मेलीन चार टक्के यासारख्या जंतूनाशक फवारणी नियमितपणे कराव्यात. त्यातून निर्जंतुकीकरणाला मदत होते.

सात ग्रॅम धुण्याचा सोडा प्रति लिटर पाणी याप्रमाणे मिश्रणामध्ये फार्म परिसर, नाले, गावातील गटारी व इतर स्थळांमध्ये फवारणी करावी ही फवारणी दर पंधरा दिवसांनी केल्याने विषाणूंचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. अन्य कोणत्याही फार्मवर उपकरणे किंवा वाहने खाद्य पाणी यांची देवाण-घेवाण टाळावे.अन्न पोल्ट्री फार्मला भेट देणे टाळावे.



# लिंबूवर्गीय फळ पिकांमध्ये उंच वाफे लागवड प्रणाली

भारतातील एकूण फळपिक क्षेत्रापैकी सुमारे ४.८३ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये लिंबूवर्गीय पिकाची लागवड केली जात असून, एकूण उत्पादन सुमारे ४२.८ लाख टन एवढे आहे. भारतातील एकूण नागपुरी संत्राचे १४७२४०१ टन उत्पादन असून १६५३७६ हेक्टर क्षेत्र आणि १०.० टन/हेक्टर उत्पादकता आहे, जे ब्राझील, चीन, मेक्सिको आणि स्पेन सारख्या इतर विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी (३०-४० टन/ हेक्टर) आहे.

सर्व लिंबूवर्गीय उत्पादक राज्यांपैकी, महाराष्ट्र राज्यात लिंबूवर्गीय पिक क्षेत्र (१.६० लाख हेक्टर) व उत्पादन (६.२ लाख टन) या बाबतींत एक आघाडीचे राज्य आहे. भारतात लिंबूवर्गीय फळे म्हणजे संत्रा, मोसंबी आणि लिंबू त्यांच्या अंतर्गत एकूण क्षेत्रफळाच्या (३.४८ लाख हेक्टर) अनुक्रमे ५०, २० आणि १५ टक्के आहे. भारतातील लिंबूवर्गीय फळांच्या लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी सुमारे ४२% क्षेत्र संत्रा पिकाने व्यापलेले आहे. मोसंबी (सायट्रस सायनेन्सिस) हे राज्यातील सर्वात प्रचलित लिंबूवर्गीय फळ असून ते महाराष्ट्राच्या विदर्भ भागात आणि मध्य प्रदेशच्या लगतच्या भागात मोठ्या प्रमाणावर घेतले जातात.

उंच वाफा : उंच वाफा ही एक आधुनिक लागवड पद्धत आहे ज्यामध्ये जमिनीच्या क्षेत्रफळानुसार १-२ मीटर रुंदीचे उंच वाफे तयार केले जातात. हि पद्धत कमी पाण्याच्या भागात फळझाडांच्या लागवडीसाठी वापरली जाते. मुसळधार पाउस असलेल्या भागातही या पद्धतीत



झाडे उंच वाफ्यावर न कोसळता वाढू शकतात तसेच पाण्यासोबत खते वाहून जाणे, मूळकुज होणे इत्यादी नुकसान टाळले जातात. उंच वाफा पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे सरींमध्ये पाणी साचले जाते व त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढते.

उंच वाफा लागवड पद्धतीची आवश्यकता : उंच वाफ्यावर फळझाडे वाढवण्याचे अनेक फायदे आहेत जसे की वसंत ऋतूमध्ये माती लवकर तापते, त्यामुळे लवकर लागवड करता येते, पाण्याचा सहज निचरा होऊ शकतो. लिंबूवर्गीय फळ झाडांची मुळे जमिनीत जास्त खोलवर जात नाहीत. त्यामुळे उंच वाफ्यातील पाणी, खते व पोषक द्रव्य यांचा झाडांच्या वाढीसाठी पुरेपूर उपयोग होतो. झाडांच्या वाढीसाठी मोकळी माती आवश्यक असते कारण मोकळ्या मातीमध्ये झाडाच्या मुळांना वाढण्यासाठी भरपूर जागा मिळते. पारंपारिक पद्धतीपेक्षा उंच वाफे पद्धत अधिक फायदेशीर ठरते. उंच वाफ्यांमुळे शिसे आणि इतर जड धातूंनी दूषित असलेल्या जमिनीवरही झाडांची सुरक्षितपणे वाढ होणे शक्य होते. या पद्धतीमुळे मातीची सुपीकता आणि गुणवत्ता सुधारते तसेच मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मात वाढ होते व क्षारतेची समस्या कमी होते. सुधारित पाणी व्यवस्थापन, उत्तम पाण्याचा निचरा व साठवण, कमी बाष्पीभवन तसेच वारा/पाणी यांची धूप कमी होते.

भाजीपाल्याची आंतरपीके : उंच वाफ्यावर लिंबूवर्गीय फळझाडांच्या लागवडीला चाळ क्षेत्रात भाजीपाला आंतरपीक घेण्यास वाव आहे. आयसीएआर-सीसीआरआयच्या प्रयोगाने शेतकऱ्यांना नवा मार्ग दाखवला आहे. २०२० मध्ये टोमॅटो, वांगी भेंडी, कोबी आणि मुळा या भाज्यांचे उत्पादन घेण्यात आले. टोमॅटो, वांगी, भेंडी आणि झेंडूच्या फुलांनीही मर्यादित क्षेत्रात (५०३० चौ.मी.) एवढी उत्पादकता दाखवून चांगली कामगिरी केली आहे. वी.एन.आर. हर्ष आणि एन.एच.बी. १००१ या जातीच्या वांग्याच्या रोपांची लागवड जून २०२० मध्ये ९०६० सें.मी. अंतरावर (रो टू रो आणि प्लांट टू प्लांट) करण्यात आली आणि कापणी जुलै महिन्यात सप्टेंबर पर्यंत सुरू झाली (२०२०) आणि जवळपास, हंगामात ३५ (टन/ हेक्टर) उत्पन्न मोजले गेले. अभिलाष जातीच्या टोमॅटोच्या एकूण ३५० रोपांची जानेवारी महिन्यात (२०२०) ६० ४५ सें.मी. अंतरावर (रो टू रो आणि प्लांट टू प्लांट) अंदाजे लागवड करण्यात आली. २५ टन / हेक्टर उत्पादन मोजले गेले. २०२० मध्ये प्रति हेक्टर क्षेत्राच्या आधारावर सुमारे ४.२९ टन/हेक्टर भेंडी, २० टन/हेक्टर फुलकोबी, २५ टन/हेक्टर पानकोबी आणि १२ टन/हेक्टर मुळा उत्पादनाची गणना करण्यात आली.




### महत्वाच्या घटना

१६५६ : शिवाजीमहाराजांनी चंद्रराव मोरे यांचा पराभव करुन रायगड किल्ला ताब्यात घेतला. चैत्र व. ७
१६५६ : चंद्रराव मोरे याचा शिवाजी महाराजांनी पराभव करुन रायगड किल्ला सर केला व आपली राजधानी केली.
१८९६ : आधुनिक ऑलिम्पिक खेळांची ग्रीसमधील अथेन्स येथे सुरूवात झाली. ग्रीक सम्राट थेडोसियस (पहिला) याने घातलेल्या बंदीमुळे १५०० वर्षे हे खेळ बंद होते.
१९१७ : पहिले महायुद्ध अमेरिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९१९ : रौलेट ॲक्टविरुध्द हरताळ पाळण्यात आला.
१९३० : प्रसिद्ध दांडीयात्रेनंतर गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला.
१९६५ : व्यापारी उपयोग करता येईल अशा प्रकारे संदेशवहन करण्याची सोय असलेला 'अर्ली बर्ड' हा उपग्रह अमेरिकेने अंतराळात सोडला. या उपग्रहामुळे माहिती व करमणुकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती घडली.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी भारत व पाकिस्तानला जोडणारी पाल्कची सामुद्रधुनी पोहून पार केली. इंग्लिश खाडीसह जगातील अनेक खाड्या त्यांनी पार केल्या होत्या.
१९८० : भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली व अटलबिहारी वाजपेयी तिचे पहिले अध्यक्ष झाले. यानंतर १९८४ मध्ये झालेल्या ८ व्या लोकसभा निवडणूकांमध्ये या पक्षाला दुसर्या क्रमांकाची मते मिळुनही फक्त दोनच जागा मिळाल्या!
१९९८ : स्तनांचा कर्करोग बरा करणार्या टॅमॉक्सीफेन या औषधाच्या चाचणीचे निकाल जाहीर करण्यात आले. या औषधामुळे होणार्या दुष्परिणामांमुळे गर्भाशयाच्या कर्करोगाची शक्यता वाढते, असे जाहीर करण्यात आले.
१९९८ : भारतापर्यंत सहज पोहोचू शकणार्या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची पाकिस्तानने यशस्वी चाचणी केली.
१९९८ : पाकिस्तानने मध्यम पल्ल्यांच्या क्षेपणास्रांची (भारतावर मारा करण्याची क्षमता असणारी) चाचणी केली.
२००० : 'मीर' या रशियाच्या अंतरिक्ष प्रयोगशाळेला जीवदान देण्यासाठी सोडलेले 'सोयूझ' हे अंतराळयान 'मीर'ला भेटले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७३ : जेम्स मिल स्कॉटिश तत्त्ववेत्ते, इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ जून १८३६)
१८६४ : सर विल्यम हार्डी ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ जानेवारी १९३४)
१८८६ : ब्रिटीश कालीन भारतातील सर्वात मोठी रियासत हैदराबाद येथील निजाम संस्थेचे शेवटचे शासक निजाम उस्मान अली खान यांचा जन्मदिन.
१८९० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (मृत्यू: ९ सप्टेंबर १९६०)
१८९० : फोक्कर एअरक्राफ्ट मॅनुफॅक्चर चे निर्माते अँटनी फोक्कर यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर १९३९)
१८९२ : डग्लस एअरक्राफ्ट कंपनी चे निर्माते डोनाल्ड विल्स डग्लस यांकॅह जन्म. (मृत्यू: १ फेब्रुवारी १९८१)
१९०९ : जी. एन. जोशी भावगीतगायक व संगीतकार. एच. एम. व्ही. या कंपनीत काम करत असताना त्यांनी अनेक नवीन गायकांना संधी देऊन त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९९४)
१९१७ : 'काव्यतीर्थ' हणमंत नरहर जोशी तथा कवी सुधांशु मराठी कथाकार व कवी (मृत्यू: १८ नोव्हेंबर २००६)
१९१९ : रघुनाथ विष्णू पंडित कोंकणी कवी (मृत्यू:)
१९२७ : विष्णू महेश्वर ऊर्फ 'व्ही. एम.' तथा दादासाहेब जोग उद्योजक (मृत्यू: २८ जून २०००)
१९२८ : जेम्स वॉटसन फ्रान्सिस क्रीक व मॉरिस विल्कीन्स या जोडीदारांसह डीएनएची संरचना स्पष्ट करणारे नोबेल पारितोषिक (१९६२) विजेते जैवरसायनशास्त्रज्ञ
१९३१ : रमा दासगुप्ता तथा सुचित्रा सेन बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेत्री. उत्तमकुमारबरोबर त्यांची जोडी बंगाली चित्रपटांत चांगलीच गाजली. (मृत्यू: १७ जानेवारी २०१४ कोलकता, पश्चिम बंगाल)
१९५६ : दिलीप वेंगसरकर क्रिकेटपटू व प्रबंधक
१९७१ : प्रसिद्ध चित्रपट अभिनेते संजय सुरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११९९ : रिचर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (जन्म: ८ सप्टेंबर ११५७)
१९५५ : धर्मभास्कर विनायक महाराजा मसूरकर यांचे निधन.
१९७३ : भारतीय केरळ साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त निबंध लेखक मल्याळम साहित्य समिक्षक कारिककट्ट मराठू कुट्टीकृष्ण मारार यांचे निधन.
१९८१ : शंकर धोंडो तथा मामा क्षीरसागर मानवधर्माचे उपासक. विदर्भातील दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालय, कोल्हापूरचा ग्रामसेवाश्रम व कोरगावकर धर्मादाय संस्था, वरोड्याचे आनंदवन, माधानचे कस्तुरबाधाम, नागपूरचा मातृसेवासंघ, देवरुखचे मातृमंदिर इ. अनेक संस्थांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.
१९८३ : जनरल जयंतीनाथ चौधरी भारताचे लष्करप्रमुख (१९६२ १९६६), हैदराबादचे लष्करी प्रशासक (१९४८ १९४९) व भारताचे कॅनडातील राजदूत, पद्?मविभूषण (जन्म: १० जून १९०८)
१९८९ : पन्नालाल पटेल ज्ञानपीठ पारितोषिक विजेते गुजराथी कथा-कादंबरीकार. चारशेहून अधिक कथांचे २५ संग्रह, ३२ कादंबर्या, ५ नाटके, बालसाहित्य यासारखी विपुल साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. (जन्म: ७ मे १९१२ मांडली, डुंगरपूर, राजस्थान)
१९९० : माकप नेते व राजकारणी तसचं कामगार संघटनेचे नेते भालचंद्र त्र्यंबक रणदिवे यांचे निधन.
१९९२ : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (जन्म: २ जानेवारी १९२०)
२००१ : भारताचे माजी ६ वे उपपंतप्रधान चौधरी देवीलाल यांचे निधन.

# प्राचीन भगवान शंकराच्या नर्मदेश्वर गडाची टेंभुर्णी गावात झाली स्थापना

पाथर्डी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातल्या शिरूर कासार तालुक्यातील टेंभुर्णी गावातील नव्याने अध्यात्म व पर्यटनाला चालना देणारे नर्मदेश्वर गडाची नुकतीच स्थापना करण्यात आली असून नर्मदेश्वर गडावर पाण्यासाठी बोरवेल घेण्यात आला दुष्काळी परिस्थितीत संघर्ष करणाऱ्या टेंभुर्णी गावात नर्मदेश्वर गडावर जमिनीच्या माथ्यापासून केवळ ९० फुटावर ३ इंच पाणी लागल्याने नर्मदेश्वराची कृपा झाली असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे याबाबत आख्यायिका अशी की शेकडो वर्षांपूर्वी संत भगवानबाबा नारायणगड सोडून टेंभुर्णी गावातील नर्मदेश्वर गडावर मुक्कामी होते परंतु स्थानिक गृहस्थांच्या विरोधामुळे संत भगवानबाबा खरवंडी कासार बाजीराव पाटलांच्या साथीने धौम्यगडावर पोहोचले आणि तेथेच संत भगवानबाबांनी भगवानगड निर्माण केला असे समकालीन गृहस्थ सांगत आहेत टेंभुर्णीच्या डोंगरावर महादेवाची जागृत पिंड असल्याने टेंभुर्णी गावचे कै.दगडू डोंगरे व कै.द्रोपदाबाई डोंगरे हे महादेवाचे भक्त असल्याने नर्मदेश्वर गडावर भगवान शंकर महादेवाची पिंड असल्याने तिथे शिक्षक नेते

**नर्मदेश्वर गडावर ९० फुटावर बोरवेलला लागले ३ इंच पाणी**



व सरपंच मिथुन डोंगरे व गावकऱ्यांच्या संमतीने मध्यप्रदेश स्थित असलेल्या नर्मदेवरून (बकावा) या ठिकाणाहून ५.५० किलो वजनाचे शिवलिंग व पिंड ४.५० किलो वजनाचा नंदी समवेत नर्मदेश्वर गडाची स्थापना करण्यात आली आहे या नर्मदेश्वर गडाची मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशरोहन सोहळा १० ऑगस्ट २०२५ ह.भ.प.त्रिविक्रमानंद शास्त्री महाराज आष्टी पाटोदा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस शिरूर कासार तहसीलदार सुरेश घोळवे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने डॉ.वाल्मीक कराड एड.जयंत राख व गावातील महिला गावकरी मंडळी यांच्या हस्ते करण्यात आले.

टेंभुर्णी गावातील नोकरदार तरुणांनी आणि जवळपास ४०० ते ५०० लेकींनी एकत्रित येत नर्मदेश्वर गडाच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशरोहन सोहळ्यासाठी स्वयंस्फूर्तीने लाखो रुपयांचा निधी जमा करत नर्मदेश्वर गडाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे टेंभुर्णी गावातील माता माय माऊली व गावकऱ्यांच्या मदतीने गावात सामाजिक सलोखा यात्राउत्सव व गावविकासासाठी वैश्विक विचारांचे कार्यक्रम राबवले जाणार आहेत. टेंभुर्णी गाव ही माझी जन्मभूमी व कर्मभूमी असल्याने मी श्रावण महिन्यात १७ ते १८ वर्ष महादेवाच्या पिंडीला बेलाची पाने पाणी दूध याने अभिषेक केला आहे माझे वडील कै.दगडू डोंगरे व आई कै.द्रोपदाबाई डोंगरे हे महादेवाचे भक्त होते त्यांचा अध्यात्माचा वारसा जपण्यासाठी व गावकऱ्यांच्या विचारविनिमयातून नर्मदेशवर गडावर व भगवान शंकर महादेवाच्या पिंडीचे जीर्णोद्धार करण्यात गावकऱ्यांचा सहभाग मोलाचा ठरला नर्मदेश्वरगड भविष्यात अध्यात्म व पर्यटन क्षेत्रात पावित्र्य टिकून ठेवण्यात सफल राहील अशी अपेक्षा आहे.

## संत भगवानबाबांच्या नारळी सप्ताहात धनंजय मुंडे उपस्थित राहणार

पाथर्डी । प्रतिनिधी

राष्ट्रसंत ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांनी प्रारंभ केलेल्या ९२ वा अखंड हरिनाम सप्ताह पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी येथे होत असून या सप्ताहाची सांगता मंगळवारी भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आमदार धनंजय मुंडे उपस्थित राहणार आहेत माजी मंत्री धनंजय मुंडे हे संत भगवानबाबांचे भक्त असल्याने ते कायमच भगवानगडावरील दसरा मेळावा असो की नारळी सप्ताह धनंजय मुंडे कायमच भगवानबाबांच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कुठेही असले तरी येत असतात यामुळे यावर्षी बडेवाडी येथे धनंजय मुंडे हे भगवानबाबांच्या दर्शनाला हेलिकॉप्टरने येणार असून ते काय सामाजिक संबोधन करणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.



राष्ट्रसंत भगवानबाबा यांनी ९२ वर्षांपूर्वी पखालडोह येथून फिरता अखंड नारळी सप्ताहाची परंपरा सुरू केली ती आजतायागत सुरू आहे भगवानगडाचे संस्थापक अध्यक्ष संत भगवानबाबा यानंतर वैकुंठवासी भीमसिंह महाराज विद्यमान महंत डॉ.नामदेव महाराज शास्त्री आणि चतुर्थ उत्तराधिकारी म्हणून ज्यांची घोषणा झाली ते कृष्णा महाराज शास्त्री अशी चौथी पिढी भगवानगडाची सेवा करत आहे भगवानगडावरती ज्ञानेश्वरी विद्यापीठ असून येथे विद्यार्थी ज्ञानेश्वरी वारकरी संप्रदाय यासोबत शैक्षणिक उच्च शिक्षण घेऊन विद्याविभूषित महाराज व अधिकारी होत आहेत.

संत भगवानबाबांचे भक्त होते त्यांच्या निधनानंतर २०१४ यावर्षी दसरा मेळाव्यावरून गडाचे महंत डॉ.नामदेव शास्त्री महाराज व मुंडे बहीण भावात वाद झाले तेव्हापासून महंत नामदेव शास्त्री यांनी भगवानगडाचा दसरा मेळावा बंद करून केवळ संत भगवानबाबांनी सुरू केलेला पारंपारिक दसरा मेळावा सुरू ठेवला राजकीय मेळाव्यास बंदी घालत पंकजा मुंडे यांना दसरा मेळावा घेण्यास बंदी घातली तेव्हापासून मंत्री पंकजा मुंडे या भगवानगडाकडे कधीही फिरकल्या नाहीत.

मंत्री पंकजा मुंडे यांनी सावरगाव येथे भगवानभक्ती गडाची निर्मिती करत राजकीय मेळावा घेण्यात सुरुवात केली काही कालखंडानंतर भाजप सरकारमध्ये स्व.अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आल्याने मुंडे बहीण भावाचे राजकीय मनोमिलन झाले परंतु लोकनेते गोपीनाथ मुंडे हे भगवानगडाकडून कधीही आमंत्रण नसताना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भगवानगडाच्या दसरा मेळाव्याससह सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना आवर्जून हजेरी लावत असत याउलट पंकजा मुंडे या भगवानगडाच्या कुठल्याही धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाकडे फिरकत नसल्याने भक्तांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी व चर्चेचा विषय असतो.

## अजिंठा लेणीत मधमाशांचा पुन्हा हल्ला; २ विदेशी पर्यटकांसह तब्बल ९० जण जखमी

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अजिंठा लेणी येथे सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या मधमाशी हल्ल्यात तब्बल ९० पर्यटक जखमी झाले असून, यात २ विदेशी पर्यटकांचाही समावेश आहे. गेल्या दोन महिन्यांत ही सातवी घटना असल्याने पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.



शुक्रवारी सकाळपासूनच अजिंठा लेणीत मधमाशांचा हल्ला सुरू झाला. लेणी क्रमांक ९, १० आणि २६ परिसरात असलेल्या आगे मोहळातील मधमाशांनी अचानक पर्यटकांवर हल्ला चढवला. दिवसभरात तब्बल ५ ते ६ वेळा हे हल्ले झाले. या हल्ल्यांमध्ये आंध्र प्रदेशातील सुमारे ३० पर्यटकांसह एकूण ९० जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये २ विदेशी पर्यटकांचाही समावेश आहे. घटनेनंतर पुरातत्त्व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ लेणी परिसरात पर्यटकांना जाण्यास बंदी घातली. जखमींना सुरक्षित ठिकाणी हलवून प्राथमिक उपचार करण्यात आले. दरम्यान, गुरुवारीदेखील याच ठिकाणी मधमाशांनी हल्ला केला होता. विशेष म्हणजे गेल्या दोन महिन्यांपासून अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे पर्यटकांमध्ये भीतीचें वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या तीन महिन्यात अजिंठा लेणी परिसरात मधमाशांनी ३२१ पर्यटकांवर हल्ला चढवला असून वारंवार होणाऱ्या या हल्ल्यांमुळे प्रशासन आणि पुरातत्त्व विभागाच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी नेमकं काय पावलं उचलली जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सोनसाखळी चोरांचा धुमाकूळ; दोन महिलांचे मंगळसूत्र ओरबाडले

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

शहरात दुचाकीस्वार सोनसाखळी चोरांचा धुमाकूळ सुरूच असून, शतपावली करणाऱ्या महिलांना टार्गेट केले जात आहे. मुकुंदवाडी आणि सिडको भागात अवघ्या दीड तासाच्या अंतराने दोन महिलांचे मंगळसूत्र ओरबाडून नेले. या घटना रात्री पावणेनऊ ते साडेदहा वाजेदरम्यान घडल्या. याप्रकरणी मुकुंदवाडी आणि सिडको पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



नागेश्वरवाडी येथील रहिवासी माया भागवत चव्हाण (६०) या पतीसोबत दुचाकीवरून जात होत्या. त्या जिजामाता चौकाजवळ पोहोचल्या असता, पाठीमागून आलेल्या दुचाकीस्वार दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पोबारा केला. या धक्क्यातून सावरल्यानंतर चव्हाण यांनी मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. फिर्यादी अर्चना भाऊसाहेब पवार (३९,रा. एन-११) या रात्री १०:३० च्या सुमारास आपल्या मैत्रिणीसह शतपावली करत होत्या. टीव्हीसेंटर परिसरातील कठाळे हॉस्पिटलजवळ येताच ३० ते ३५ वयोगटातील दोन दुचाकीस्वार त्यांच्याजवळ आले. अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न करून वाद निर्माण केला. अर्चना यांनी त्याला माझ्या अंगावर गाडी घालतो का, असे म्हणत सुनावले. त्यानंतर एका चोरट्याने त्यांच्याशी बोलण्याचा बहाणा करून जवळ येत काही समजण्याच्या आतच त्यांच्या गळ्यातील ८ ग्रॅमची सोन्याची पोत हिसकावून टीव्हीसेंटर चौकाच्या दिशेने धूम ठोकली. दरम्यान, एकाच रात्री दीड तासाच्या अंतरात झालेल्या या दोन चेन स्नॅचिंगच्या घटनांमुळे पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गेल्या काही महिन्यांत महिलांना टार्गेट करून दागिने हिसकावण्याच्या घटना वाढल्या आहेत.

## चिखली बँकेची बिनविरोध निवडणूक परंपरा कायम
## सतीश गुप्ता तिसऱ्यांदा अध्यक्ष

जालना। प्रतिनिधी

चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांच्या नेतृत्वात १५ संचालक बिनविरोध निवडले गेले. सतीश गुप्ता हे तिसऱ्यांदा बँकेचे बिनविरोध निवडणूक मध्ये अध्यक्षपदावर कायम आहे.



अध्यक्षपदीबँकेचा चढता आलेख कायम ठेवून संस्कारतून सहकाराकडे बँकेची वाटचाल करीत पारदर्शक व्यवहाराचा हा विजय असल्याचे यावेळी गुप्त म्हणाले. विदर्भातील सहकार क्षेत्रात चिखली अर्बन बँकेची आगळीवेगळी छाप असून सर्व स्तरातील घटकांना योग्य प्रतिनिधित्व देण्यात श्री. सतीश भाऊ गुप्ता नेहमी आग्रही राहिले आहे. सहकार क्षेत्रात बिनविरोध निवडणूक होणे म्हणजे एक दिव्य समजले जाते. परंतु सतीश गुप्त यांनी ही निवडणूक बिनविरोध करून परंपरा कायम ठेवली. चिखली अर्बन बँकेच्या शाखेमध्ये अनेक बेरोजगारांना आर्थिक सहाय्य देऊन झिरोचे हिरो करून आघाडीचे उद्योजक बनविले. याचबरोबर बँकेच्या सर्व व्यवहारावर त्यांचे लक्ष होते. त्यांनी बँकेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात भरपूर योगदान दिले असून या बिनविरोध निवडीचे सर्व सहकार क्षेत्रात व बँक कर्मचारी स्थानिक सल्लागारां तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे

## मंगळसूत्र चोरी करणाऱ्या टोळीला अटक

धाराशिव । प्रतिनिधी

येरमाळा येथील येडेश्वरी यात्रेदरम्यान महिला भाविकांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. ३ एप्रिल रोजी ही कारवाई करण्यात आली.

पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यात्रेतील गर्दीच्या ठिकाणी पायी गस्त घालत होते. यावेळी गुप्त माहितीदारामार्फत आमराई परिसरातील मंदिराजवळ दोन महिला व एक पुरुष संशयास्पद हालचाली करत असल्याची माहिती मिळाली. पथकाने तत्काळ त्या ठिकाणी जाऊन संशयितांवर पाळत ठेवली. गर्दीत ते चोरी करण्याच्या तयारीत असल्याचे लक्षात येताच त्यांना ताब्यात घेण्यात आले. सुरुवातीला समाधानकारक उत्तरे न दिल्याने त्यांना येरमाळा पोलीस ठाण्यात आणून सखोल चौकशी करण्यात आली. आरोपींची नावे अनिल शेषेराव शिंदे (वय ३४), सुनिता अनिल शिंदे (वय २९) आणि हिराबाई रमेश शिंदे (वय ४०, सर्व रा. इंदिरानगर, पाथरी, जि. परभणी) अशी असल्याचे निष्पन्न झाले.पंचांच्या उपस्थितीत अंगझडती घेतली असता अनिल शिंदे याच्या पँटच्या खिशातून चार वेगवेगळे सोन्याचे मंगळसूत्र आढळून आले.

## अंकुश कासुळे यांची भगवानगड माऊली मंदिरासाठी २ लाख ५१ हजारांची वर्गणी

पाथर्डी । प्रतिनिधी

भालगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व माजी सरपंच अंकुशराव कासुळे पाटील यांनी श्री क्षेत्र भगवानगडावर होत असलेल्या माऊली मंदिराच्या बांधकामासाठी २ लाख ५१ हजार रुपये वर्गणी भगवानगडाचे महंत डॉ.नामदेव शास्त्री महाराज यांच्याकडे सुपूर्त केली आहे.



भालगाव येथे नुकत्याच मच्छिंद्रनाथ देवस्थान मायंबा येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी भगवानगडाचे महंत डॉ.नामदेव शास्त्री महाराज आले असता आमदार मोनिका राजळे मच्छिंद्रनाथ मायंबा देवस्थानचे महंत नवनाथ महाराज शास्त्री आणि भालगाव येथील गावकऱ्यांच्या उपस्थितीत अंकुशराव कासुळे यांनी देणगी सुपूर्त केली.

# आई राजा उदे उदे...च्या गजरात भाविकांनी वेचला चुना

धाराशिव । प्रतिनिधी

श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पोर्णिमा यात्रा महोत्सवात यात्रेतील मुख्य सोहळा चुनखडी वेचण्यासाठी लाखो भाविक येरमाळा नगरीत दाखल झाले होते. यात्रेचा मुख्य दिवस लाखो भाविकांच्या गर्दीमुळे गजबजून गेला. या वर्षी श्री येडेश्वरी देवीची यात्रा मोठ्या प्रमाणात भरली असून चुना वेचण्याचा मुख्य कार्यक्रम शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमासाठी राज्यासह बाहेर राज्यातील चौदा ते पंधरा लाख भाविक येरमाळा नगरीत दाखल झाले होते. येडेश्वरी देवीची पालखी मुख्य मंदिरावरून सकाळी आठ वाजता निघाली बाजार चौकात सकाळी १० वाजता पालखीचे आगमन झाल्यानंतर पुष्पहारांनी पालखीचे स्वागत करण्यात आले. चुन्याच्या रानात सकाळी ११ वा पालखीचे आगमन होताच लाखों भाविकांनी चुनखडीचे खडे वेचून पालखीवर टाकत आई राजा उदे उदेचा एकच जय घोष केला भाविकांच्या या गजराने चुन्याच्या रानाचा परिसर दुमदुमून गेला होता. सकाळी येडेश्वरी देवीची पालखी डोंगरावरील मंदिरातून आमराई मंदिराकडे हालगी, जहांज, संबळाच्या गजरात वाजत गाजत निघाली. पुढील पाच दिवस पालखी अमराई मंदिरामध्ये मुक्कामी असते. मुख्य चुन्याच्या रानात पालखी येताच भाविकांनी आई राजा उदे उदे, येडुसरीचा उदे उदेच्या जयघोष करताच चुन्याच्या रानाचा परिसर भाविकांच्या गजराने दणाणून निघाला. श्री येडेश्वरी देवीच्या मंदिराला यात्रेनंतर पालखी डोंगरावरील मुख्य मंदिरात परत गेल्यानंतर चुन्याने रंगावण्याची पूर्वापार परंपरा चालत आली आहे. त्यामुळे चुना वेचण्याचा कार्यक्रम यात्रेचा मुख्य कार्यक्रम मानला जातो. चुना वेचण्यासाठी यात्रेला येण्याची परंपरा भाविकांच्या पिढ्यान्?पिढ्या चालत आलेली प्रथा असल्याने मजूर, शेतमजूर, बिगारी, चाकरमानी कर्मचारी, लहान मोठे व्यावसायिक, व्यापारी,भाविक राज्यभरातून न चुकता दरवर्षी चुना वेचण्यासाठी दाखल होतात. काळानुरूप या यात्रेला येणाऱ्या भाविकांची संख्या प्रतिवर्षी वाढतच गेल्याने आता ती लाखोंच्या संख्येवर पोहचली. श्री येडेश्वरी देवीच्या चुना वेचण्याच्या कार्यक्रमाला वेगळे महत्त्व असून यात्रेत या दिवशी येणाऱ्या पालखीवर चुन्याच्या रानात पालखी येताच चुन्याचे पाच खडे वेचून पालखीवर टाकण्यासाठी लाखों भाविकांची झुंबड उडते. त्यामुळे भाविकांची आपले चुन्याचे खडे पालखीवर पडावे यासाठी स्पर्धाच लागली आहे की काय असे चित्र दिसत होते. यात्रेत भाविकांनी वेचलेला चुना गोवऱ्याची भट्टी लावून भाजला जातो यात्रेनंतर पालखी मुख्य मंदिरात पोहचल्याच्या दुसऱ्या दिवशी देवीचे मंदिर चुन्याने रंगवले जाते. त्यामुळे यात्रेत चुना वेचण्याचा प्रथा रुढ झाल्याचे जाणकारांचे मत आहे. ही परंपरा पिढ्यान्?पिढ्या चालत आली असून चुन्याच्या रानात पालखी येताच चुनखडीचे खडे आपोआप रानात येतात असे लोक सांगतात. चुन्याच्या रानातून देवीची पालखी १२.३० वाजता आमराई मंदिरातील पालखी मंदिरात पोचली येथेही पालखी दर्शनासाठी भाविकांनी दिवसभर गर्दी केली होती. श्री येडेश्वरी देवीच्या यात्रेसाठी पोलिस प्रशासनाने विविध उपाय योजना आखून तगडा बंदोबस्त केला होता.आज पालखी मुख्यमंदिरातून पोलिस प्रशासन, देवस्थान सयंसेवक ,स्थानिक ग्रामसुरक्षा दलाच्या संरक्षण कड्यात निघाल्याने सुरक्षितपणे पालखी मिरवत आली. यावेळी ग्रामपंचायतचे पदाधिकारी, देवस्थानचे पुजारी, मानकरी, खांदेकरी पालखी सोबत होते. पालखीच्या दर्शनासाठी लोकप्रतिनिधी आ. राणाजगजीतसिंह पाटील, आ. कैलास पाटील उपस्थित होते. भाविकांना पिण्याच्या पाण्यासाठी ठिकठिकाणी पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली होती.भारतीय स्टेट बँकेच्या वतीने थंड आरओ पाण्याच्या पाणपोईची व्यवस्था करण्यात आली होती.पालखी चुन्याच्या राणात येताच आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सहकार्यातून हेलिकॉप्टरमधून पालखीवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी आलेल्या लाखो भाविकांनी हा सोहळा आपल्या डोळ्यात साठवला. ठिकठिकाणी अनेक गावकरी व लोकप्रतिनिधी यांच्या वतीने भाविकांना पाणी, जेवण, नाष्ट्याची सोय करण्यात आली होती. देवीच्या पालखीचे आज चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त आमराई मंदिराकडे आगमन होणार असल्याने स्थानिक भविकांत मोठा उत्साह होता. पालखीच्या स्वागतासाठी गावातील महिला भाविकांनी बाजारचौक, वाणीगल्ली, रोकडेश्वर मारुती मंदिर चौक, छत्रपती मार्केट, संभाजीनगर रस्त्यावर मोठमोठ्या रांगोळी,फुलांच्या रांगोळीची सजावट केली होती.

# व्यापाऱ्याला मारहाण करत दहशत




## चौसाळ्यात गाडीच्या काचा फोडणाऱ्याला पोलिसांचे अभय?

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील एका किराणा व्यापाऱ्याला मारहाण करत चारचाकी गाडीची तोडफोड करून जीव मारण्याच्या धमक्या दिल्याची गंभीर घटना समोर आली आहे. याप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्याऐवजी पोलिसांनी केवळ एनसी नोंद करून त्याला अभय दिल्याचा आरोप होत असून, संतप्त व्यापारी शिंदे यांनी थेट पोलीस अधीक्षकांकडे धाव घेतली आहे.

तक्रारदार प्रशांत रेवननाथ शिंदे (रा. चौसाळा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश उर्फ अण्णा वसंत जाधव या व्यक्तीने २८ मार्च रोजी रात्री दारूच्या नशेत येऊन त्यांच्या दुकानासमोर गोंधळ घालत जातिवाचक शिवीगाळ करत दुकानासमोर असलेल्या एर्टिगा गाडीवर दगडफेक करून काच फोडली. या घटनेमुळे चौसाळा मुख्य रस्त्यावर काही काळ तणाव निर्माण झाला होता. या घटनेनंतर नेकनूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता, पोलिसांनी एफआयआर नोंदविण्याऐवजी एनसीआर (क्र. १६४/२०२६) दाखल करून प्रकरण दडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, तक्रार दिल्याचा राग मनात धरून आरोपीने ३० मार्च रोजी सकाळी पुन्हा गाडीवर दगडफेक करत समोरील व साईड काचा फोडल्या तसेच बोनटचेही नुकसान केले. या घटनेत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. शिंदे यांनी पुढे असा गंभीर आरोप केला आहे की, संबंधित आरोपी हा गुंड प्रवृत्तीचा असून चौसाळा बस स्थानक परिसरात बेकायदेशीर धंदे हातभट्टी,दारू,गांजा विक्री करतो यामुळे त्याचे पोलिसांशी संबंध असून तो गुंड प्रवृत्तीचा असल्याचा देखील उल्लेख केला आहे. पोलीसाची असलेल्या संबंधामुळेच पोलिसांनी त्याच्यावर कठोर कारवाई टाळल्याचे सांगितले जात आहे. एवढेच नव्हे, तर तक्रार मागे न घेतल्यास खोटा गुन्हा दाखल करून जेलमध्ये टाकण्याची धमकी पोलीस निरीक्षकांनी दिल्याचाही आरोप अर्जात करण्यात आला आहे.या संपूर्ण प्रकरणामुळे चौसाळा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, तक्रारदाराने स्वतःच्या व कुटुंबाच्या सुरक्षेबाबतही चिंता व्यक्त केली आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपीसह संबंधित पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणाकडे बीड जिल्हा पोलीस प्रशासन कशाप्रकारे पाहते आणि पुढे कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बीडसांगवीत पोलिस कर्मचाऱ्यांचा गावकऱ्यांच्या वतीने झाला गुणगौरव

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील डोंगराळ भागातील कणसेवाडी बीड सांगवी येथील शेतकरी पोपट करडुळे यांचा मुलगा प्रदिप पोपट करडुळे यांची अहिल्या नगर येथे पोलिस कॉन्स्टेबल निवड झाल,व दुसरा शेतकरी कणसेवाडी येथील रोहीदास बावणे यांचा मुलगा नागेश रोहीदास बावणे यांची पिंपरी चिंचवड येथे पोलिस कॉन्स्टेबल निवड झाल,व बीड जिल्हा




गुप्तवार्ता विभाग खात्याचे अधिकारी चंद्रहार सर्जेराव करांडे यांचा मुलगा यश चंद्रहार करांडे पाटील त्याची पालघर पोलिस कॉन्स्टेबल मध्ये निवड झाल.

त्यामुळे बीड सांगवी ग्रामस्थ व ग्रामपंचायत वतीने आज दि ५/४/२०२६ रोजी भौरवनाथ मंदिर परिसरात भव्य दिव्य सत्कार ◀◀ पान ३ वर



**माजलगाव:- येथील दै राज्य लोकतंत्रचे तालुका प्रतिनिधी पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना ज्येष्ठ नेते कचरु तात्या खळगे, शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे, ज्येष्ठ पत्रकार महेंद्र मस्के,वंचित बहुजन आघाडीचे नेते धम्मानंद साळवे, सेवानिवृत्त वन अधिकारी शेखी माजीद साहेब, प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. मुजीब सौदागर, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी शेख युनूस सर, छबनराव तावरे, चँदसाहाब पटेल यांची उपस्थिती होती.**

## चौसाळा ग्रामपंचायतची घंटागाडी बंद, गावात घरोघरी कचरा साचला



### कचरा डेपोसाठी जागा द्यावी सरपंचांची मागणी

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा तालुका बीड येथील स्थानिक ग्रामपंचायतीची दररोज गावात कचरा गोळा करण्यासाठी असलेली घंटागाडी गेल्या १५ ते २० दिवसापासून बंद झालेले आहे गावात व गावाबाहेर कचरा डेपोसाठी कचरा बाहेर टाकण्याकरता जागा उपलब्ध नसल्याने गावात कचरा गोळा करण्याची घंटागाडी बंद करण्यात आली असे कळते सदर प्रकरणी माहिती अशी की गावातील घंटागाडी द्वारे गोळा करण्याचे व बाहेर नेऊन टाकण्याचे असलेले काम ग्रामपंचायत रोजच्या रोज करीत होते सदर गाडी हे गेल्या पंधरा ते वीस दिवस बंद असल्याने परिणामी गावातील घरोघरी कचरा सासला असल्याने घरात व गल्लीत ◀◀ पान ३ वर

## संतभूमी अर्बनची आर्थिक कामगिरीत सातत्यपूर्ण प्रगती

बीड । प्रतिनिधी

संतभूमी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.,बीड या पतसंस्थेने ३१ मार्च २०२६ अखेर आर्थिक कामगिरीत सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय प्रगती नोंदवत स्थैर्य, पारदर्शकता आणि विश्वासार्हतेचा आदर्श निर्माण केला आहे. स्थापनेपासूनच ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त असलेल्या या पतसंस्थेने प्रगतीचा नवा टप्पा गाठत एकूण व्यवसायाचा ७९० कोटी ७३ लाखांचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.




या यशस्वी वाटचालीमागे संस्थापक-अध्यक्ष श्री. अर्जुन राऊत तसेच संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, एम.डी. आणि संचालक मंडळ यांचे दूरदर्शी नेतृत्व व मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने शिस्तबद्ध नियोजन, पारदर्शक कारभार आणि सभासद-केंद्रित धोरणांचा प्रभावीपणे अवलंब केला आहे.

संस्थेच्या ताज्या आर्थिक आकडेवारीनुसार, ठेवी १७८३.३५ लाखांपर्यंत पोहोचल्या असून कर्ज वितरण ११५१.७० लाख इतके झाले आहे. तसेच गुंतवणूक ४३६.२३ लाखांपर्यंत वाढली आहे. अधिकृत भाग भांडवल ३०० लाख व वसूल भाग भांडवल १६१.६५ लाख इतके असून संस्थेची भांडवली रचना अधिक सक्षम होत असल्याचे दिसून येते.

विशेष म्हणजे, संस्थेने कर्ज व्यवस्थापनात उत्कृष्ट कामगिरी करत एकूण अनुत्पादक कर्ज २.९७ टक्के आणि निव्वळ अनुत्पादक कर्ज १.२० टक्के इतके नियंत्रित पातळीवर राखले आहे. यामुळे संस्थेच्या कर्ज वसुली प्रक्रियेची कार्यक्षमता आणि शिस्त अधोरेखित होते. या शिवाय संस्थेने दैनंदिन नफा ५.०९ लाख इतका नोंदवला असून, बँकिंग निकषांचे काटेकोर पालन करत संस्थेने महत्त्वाचे ◀◀ पान ३ वर

### बीड जिल्ह्यातील १५ पोलीस आमलदार झाले पोलीस उपनिरीक्षक

## राज्यातील ४०३ अंमलदार झाले फौजदार

बीड । प्रतिनिधी

पोलीस महासंचालकाच्या वतीने राज्यातील ४०३ पोलीस आमदारांना पदोन्नत्या देण्यात आल्या असून त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आल्याचे आदेश विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) सुप्रिया पाटील यादव यांनी दिनांक २ एप्रिल रोजी पारित केले आहेत. या यादीमध्ये बीड जिल्ह्यातील १५ आमदारांचा समावेश आहे.



विभागीय अहर्ता परीक्षा उत्तीर्ण असलेल्या बीड जिल्ह्यातील १५ पोलीस अंमलदारांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांना आता पदोन्नतीने इतर जिल्ह्यांमध्ये नियुक्ती मिळणार आहे. या यादीमध्ये बीड जिल्ह्यातील मोहन आश्रुबा क्षीरसागर , लक्ष्मण निवृत्ती जायभाये, रमेश कुंडलिक शिरसाठ, कल्याण आजिनाथ औटे, अशोक रामभाऊ नलावडे, मोहन बाबासाहेब मिसाळ, राम एकनाथ यादव, जयसिंग नरसिंग वाघ, अशोक बाबासाहेब सोनवणे, बलराज दामोदर सुतार, वैजनाथ ज्ञानोबा बिनवाडे, सुरेश केशवराव सांगळे , शिवाजी रामराव डोंगरे, सुनील मनबहादूर लामा, सत्यनारायण कृतवर्मा खेत्रे अशा १५ जणांचा समावेश आहे. या यादीमध्ये राज्यातील ४०३ अंमलदारांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली असून या सर्व अंमलदारांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. पदोन्नती झालेल्या सर्व अमलदारांना आता जिल्हा बाहेर नियुक्त्या देण्यात येणार आहेत.

## आज माजलगावात भाजपा संपर्क कार्यालयाचा भव्य शुभारंभ सोहळा

### संघटनात्मक बळकटीला नवी दिशा मिळणार -रत्नपारखी,कचरे,सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

शहर व तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांसाठी अभिमानाची बाब ठरणारा भाजपा संपर्क कार्यालयाचा भव्य शुभारंभ सोहळा आज भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनाच्या दिवशी सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी २:०० वाजता उत्साहात पार पडणार आहे. या मुळे भाजपच्या संघटनात्मक बळकटी ला नवी दिशा मिळणार आहे असे भारतीय जनता पार्टीचे माजलगाव शहर मंडळाचे तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी प्रतिनिधी शी सांगितले



या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास लोकनेत्या पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

माजलगाव तालुक्यातील सर्व भाजपा मान्यवर नेते, पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती प्रमुख तसेच कार्यकर्त्यांनी या ऐतिहासिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. आपली उपस्थिती, हीच सशक्त भाजपाची ताकत! असा संदेश देत या कार्यक्रमाला विशेष महत्त्व ◀◀ पान ३ वर

## बीडमध्ये शिवसेना संघटन एकजुटीने मजबूत करा- मनोज शिंदे

### नवनिर्वाचित संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांचा बीडमध्ये भव्य सत्कार!

बीड । प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारधारेचा वारसा पुढे नेत, महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना संघटन बळकट करण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर बीड जिल्हा संपर्कप्रमुख पदी मनोजजी शिंदे साहेब यांची



नियुक्ती होताच जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

काल दि. २ एप्रिल २०२६ रोजी बीड शहरातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात मनोजजी शिंदे साहेब यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना तसेच विविध अंगीकृत संघटनांचे अजीमाजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारानंतर बोलताना मनोजजी शिंदे साहेब यांनी २०२९ हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून शिवसैनिकांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. बाळासाहेब ठाकरे आणि आनंदजी दिघे साहेब यांनी नेहमीच महाराष्ट्राच्या हितासाठी लढा दिला. त्याच विचारांवर चालत उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे आणि खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब राज्याच्या विकासासाठी कार्यरत आहेत. आता संघटन अधिक मजबूत करून २०२९ साठी सज्ज होणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब यांनी बीड जिल्ह्याच्या संपर्कप्रमुख पदी मनोजजी शिंदे साहेब यांची नियुक्ती झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला व बीड जिल्ह्याला शिवसेना संघटन मजबूत करण्यासाठी एक चांगला कर्णधार मिळाला असल्याचे मत व्यक्त केले.

दरम्यान, बीड नगरपालिकेचे सभापती संजय उडान व प्रीतम चक्रे यांचाही मनोज शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच ◀◀ पान ३ वर

## डोंगरपट्ट्यात अवकाळी पाऊस व गारपिटीचा पिकांना मोठा फटका

वडवणी । प्रतिनिधी

**धारूर तालुक्यातील तेलगाव महसूल मंडळातील डोंगरपट्ट्यात दि.३१ मार्च ते ०४ एप्रिल दरम्यानअचानक झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने व गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. पहाडी पारगाव,पहाडी दहीफळ, ढगेवाडी, चारदरी, थेटेगव्हण, चोरांबासह परिसरातील अनेक गावांमध्ये या पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. ज्वारी, बाजरी,गहू, कांदा, तूर तसेच टरबूज, आंबा पिकांना जोरदार फटका बसला आहे अनेक शेतकऱ्यांच्या सौर प्लेट फुटल्या आहेत उभी पिके जमीनदोस्त झाली आहेत. त्यामुळे शेतकरीवर्ग हवालदिल झाला आहे.**

अचानक वातावरणात बदल होऊन गडगडाट,विजांचा कडकडाट आणि



वेगवान वाऱ्यासह मुसळधार पावसाने व गारपिटाने हजेरी लावली. अनेक शेतकऱ्यांचे वाऱ्याच्या,गारपिटीच्या तडाख्यामुळे पिके आडवी झाली आहेत. विशेषतः ज्वारी, गहू, हरभरा ही पिके काढणीच्या अंतिम टप्प्यात होती. काही ठिकाणी गहू काढणीस तयार होते. मात्र या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे सर्व श्रम आणि खर्च वाया गेल्याची भावना व्यक्त होत आहे. डोंगरपट्ट्यातील आंबा बागांनाही मोठा फटका बसला आहे. वादळी वाऱ्यामुळे व गारपिटांमुळे आंब्याच्या कैऱ्या गळून पडल्या आहेत, तर काही ठिकाणी कच्ची फळेही झाडावरून खाली पडली. फळबागांनाही मोठा फटका बसला आहे , शेतकऱ्यांच्या सौर प्लेट गारपिटीमुळे फुटले आहेत आणि कच्च्या फळांची गळती झाली आहे. काही भागांत शेतातील जनावरांच्या चाऱ्याचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे दुहेरी संकट ओढावले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## हसन साहेब पठाण साहेब यात्रेनिमित्त भव्य संदल सोहळ्याचे आयोजन!

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहराचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत हसन साहेब पठाण साहेब यांच्या वार्षिक यात्रेचे औचित्य साधून, पाटोदा नगरपंचायत कार्यालय आणि लोकनेते सुरेश आण्णा धस मित्र मंडळ, पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'संदल' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वाजता मोठ्या थाटामाटात पार पडणार आहे.

राजकीय आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन

लोकनेते सुरेश आण्णा धस यांच्या विचारांचा वारसा जपत, मित्र मंडळ आणि नगरपंचायत प्रशासनाने या धार्मिक उत्सवासाठी जय्यत तयारी केली आहे. नगराध्यक्ष राजू भैया जाधव यांच्यासह नगरपंचायतीचे सर्व पदाधिकारी या सोहळ्याचे मुख्य आकर्षण असतील. पाटोदा शहराच्या एकोप्याचे प्रतीक असलेल्या या यात्रेत दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वधर्मीय बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

मान्यवरांची मांदियाळी

या मंगलमयी प्रसंगी नगराध्यक्ष राजू भैया जाधव, उपनगराध्यक्ष, सर्व गटनेते, मुख्याधिकारी, विविध समित्यांचे सभापती, उपसभापती तसेच नगरपंचायतीचे सर्व सन्माननीय नगरसेवक आणि कर्मचारी यांची उपस्थिती प्रार्थनीय आहे. लोकनेते सुरेश आण्णा धस मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या सोहळ्यासाठी विशेष परिश्रम घेतले असून, संदल मार्गावर ठिकठिकाणी स्वागत करण्यात येणार आहे.

नगरपंचायत कार्यालय आणि लोकनेते सुरेश आण्णा धस मित्र मंडळाच्या वतीने पाटोदा शहरातील सर्व नागरिक, आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि भाविक भक्तांना या संदल सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे नम्र आवाहन करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अखेर १० कोटींचा 'तो' वाद मिटला; ६ लाख पुणेकरांचा पाण्याचा प्रश्न सुटण्याची शक्यता !

**पुणे । प्रतिनिधी**

मुठा उजवा कालव्याच्या बांधामधून पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी टाकण्यासाठी जलसंपदा विभाग जागा भाडेपट्ट्याने घेण्याच्या प्रस्तावाला पालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिली आहे. या बदल्यात पालिकेला १० कोटी ३७ लाखांच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १००० मिमी व ५०० मिमी व्यासाच्या जलवाहिन्या स्वारगेट ते जवाहरलाल नेहरू रस्त्यापर्यंत टाकण्याचे नियोजन आहे. यासाठी जलसंपदा विभागाच्या मालकीची जागा वापरणे आवश्यक असल्याने भाडेपट्टा देण्यास शासनस्तरावर मान्यता देण्यात आली आहे.

पालिकेकडून ही जलवाहिनी कालव्याच्या शेजारून टाकण्यात येणार होती. मात्र, या मार्गावर आधीच पावसाळी जलवाहिन्या, ड्रेनेज लाईन, मेट्रो, उड्डाणपूल तसेच इतर पायाभूत सुविधा अस्तित्वात आहेत. त्यामुळे नव्याने जलवाहिनी टाकताना तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. तसेच काही ठिकाणी नाला क्रॉसिंगच्या ठिकाणी काम अधिक गुंतागुंतीचे होण्याची शक्यता होती. त्यामुळे रस्ता खोदकाम टाळण्यासाठी कालव्याच्या बांधामधून जलवाहिनी टाकण्याचा पर्याय निवडला आहे. पालिकेकडून पर्वती जलकेंद्र ते मित्रमंडळ चौकातून पुढे पंडीत नेहरू



रस्त्या पर्यंत सुमारे अडीच किलोमीटरची नवीन १००० मिमी व ५०० मिमी व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यासाठी पालिकेने वर्षभरापूर्वी जलसंपदा विभागाकडे कामाला मान्यता देण्याची मागणी केली होती. मात्र, जलसंपदा विभागाने पालिकेकडे जागेच्या भाड्यापोटी एकवट निधी म्हणून तब्बल १०.३७ कोटी रुपयांच्या शुल्काची मागणी केली होती.

कालव्यालगतचा रस्ता काँक्रिटीकरण करण्याचा हट्ट धरला होता. महापालिकेकडून केली जाणारी कामे नागरिकांसाठीची असल्याने तसेच पालिकेस जलवाहीनी टाकण्यासाठी इतर कोणताही शासकीय विभाग शुल्काची मागणी करत नसल्याने हे शुल्क देण्यास नकार दर्शविला होता. मात्र, पाण्याची वाढती टंचाई लक्षात घेत पालिकेने अखेर एक पाऊल मागे घेतले आहे. ही जलवाहिनी टाकल्यास शुक्रवार पेठ, गुरुवार पेठ, गंज पेठ, बुधवार पेठ, नाना पेठ, काशेवाडी, भवानी पेठ, रविवार पेठेसह या परिसरातील सहा ते साडेसहा लाख नागरिकांना दररोज तब्बल ८० एमएलडी पाणी दिले जाणार आहे. या भागातील कमी दाबाने पाणी येणे, तसेच पाणी कमी येण्याची समस्या कायमची दूर होणार आहे. सध्या या भागात जुन्या जलवाहिन्यांमधून पाणी दिले जाते. त्या वारंवार फुटत असून त्यांना मोठया प्रमाणात गळतीही आहे. त्यामुळे लाखो लीटर पाणी वाया जात आहे. ही बाब लक्षात घेवून या नवीन जलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत.

## राष्ट्रीय पक्ष माझ्या संपर्कात, लक्ष्मण हाके बारामतीची पोटनिवडणूक लढणार;आज उमेदवारी अर्ज भरणार

**बारामती । प्रतिनिधी**

राज्यातील दोन्ही पोटनिवडणुकांकडे महाराष्ट्राचं लक्ष लागलं असून राहुरी विधानसभेची निवडणूक (एश्रशलींळेप) बिनविरोध होणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यातच, आता बारामतीची (इरीरींळ) देखील पोटनिवडणूक बिनविरोध होणार नाही, असेच चित्र आहे. कारण, येथील पोटनिवडणुकीसाठी आत्तापर्यंत १९ उमेदवारांनी आपला अर्ज दाखल केला आहे. याशिवाय, ओबीसी नेते लक्ष्मण हाके (ङ्गारप क्ष्ड्ढश) यांनीही उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्धार बोलून दाखवला. आता, अर्ज भरण्यासाठी एकच दिवस शिल्लक आहे. मी सोमवारी अर्ज भरणार असून राष्ट्रीय पक्ष माझ्या संपर्कात



असल्याचं त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून सुनेत्रा पवार ह्या राष्ट्रवादीच्या उमेदवार असणार आहेत. ६ एप्रिल रोजी त्या आपला उमेदवारी अर्ज भरणार असून येथील निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीचे सर्वच नेते प्रयत्न करत आहेत. त्यातच, महाविकास आघाडीलाही सुनेत्रा पवार यांच्याकडून विनंती केली जात आहे. त्याच अनुषंगाने आज त्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंशी फोनवरुन चर्चा करत पाठिंब्यासाठी विनंती केली. त्यानंतर, ठाकरेंच्या शिवसेनेनंही सुनेत्रा पवार यांनाच पाठिंबा जाहीर केल्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, काँग्रेस उमेदवार देणार असल्याची चर्चा आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता लक्ष्मण हाके यांनीही शड्डू ठोकला आहे.


लक्ष्मण हाके यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत झालेल्या बैठकीत बारामती पोटनिवडणूक लढवणारं निश्चित केलं आहे. मात्र, ते अपक्ष लढवणार की कोणत्या पक्षाकडून हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे. सोमवारी लक्ष्मण हाके उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. राष्ट्रीय पक्ष माझ्या संपर्कात आहेत, असे त्यांनी यावेळी बोलताना म्हटले. त्यामुळे, बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच चित्र सोमवारीच स्पष्ट होईल. काँग्रेस माघार घेणार की उमेदवार देणार हे पाहायला मिळेल. दरम्यान, बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले यांनी देखील आपला अपक्ष अर्ज दाखल केला आहे.

## मेट्रो विस्तारासाठी 'इतक्या' झाडांची होणार कत्तल; धक्कादायक आकडा समोर

**पुणे । प्रतिनिधी**

मेट्रो कामांमुळे तोडल्या जाणाऱ्या २३८६ झाडांच्या बदल्यात सुमारे ४१ हजार झाडे लावण्याची योजना महामेट्रोने आखली असली, तरी त्यासाठी शहरात पुरेशी जागाच उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले आहे. वृक्ष लागवडीच्या जागेसाठी विविध सरकारी संस्थांना जागेची विचारणा करणारे पत्र महामेट्रो नुकतेच पाठवले आहे. त्यामुळे पुण्यातील मोकळ्या जागांच्या तीव्र टंचाईचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. शहरातच जागा नसताना ही झाडे नेमकी कुठे लावली जाणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे मेट्रोच्या दोन मार्गिका सध्या सुरू असून त्यांच्या विस्ताराची कामे सुरू आहेत. पिंपरी-चिंचवड ते निगडी, स्वारगेट ते कात्रज, वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते



वाघोली या विस्तारांसह खडकवासला-खराडी आणि नळस्टॉप-माणिकबाग या नव्या मार्गिकांचे कामही लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पांमुळे सुमारे २३८६ झाडे बाधित होणार असून, महाराष्ट्र (शहरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम, १९७५ च्या नुसार त्यांच्या बदल्यात सुमारे ४१ हजार झाडे लावणे बंधनकारक आहे. दरम्यान, तज्ज्ञांच्या मते भरपाई स्वरूपातील वृक्षलागवड कागदोपत्री चांगली वाटत असली तरी शहरी भागात तिची अंमलबजावणी प्रचंड कठीण ठरणार आहे. पुण्यासारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरात मोकळ्या जागा कमी होत असल्याने मोठ्या प्रमाणावर लागवडीसाठी योग्य जागा उपलब्ध करणे ही मोठी अडचण ठरत आहे. पर्यावरण अभ्यासकांच्या मते, प्रौढ झाडांचे पर्यावरणीय योगदान नव्याने लावलेल्या रोपांद्वारे तत्काळ भरून निघू शकत नाही.

त्यामुळे ४१ हजार झाडे हा आकडा प्रभावी वाटत असला, तरी त्याचा कितपत फायदा होईल हा प्रश्न आहेच. तसेच, विखुरलेल्या जागांवर लागवड केल्यास त्यांचे संगोपनही आव्हानात्मक ठरते. पुरेशी देखभाल न झाल्यास ही लागवड केवळ आकडेवारीपुरती मर्यादित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. याआधी मेट्रोच्या पहिल्या दोन मार्गिकांमुळे झालेल्या वृक्षतोडीच्या बदल्यात सुमारे २१ हजार झाडांची लागवड झाली होती. तर काही वृक्षांचे पुनर्रोपणदेखील त्यांनी केले होते. मात्र, लागवड केलेल्या २१ हजार झाडांपैकी बहुतांश झाडे जगलीचं नाही. यामुळे प्रत्यक्ष पर्यावरणीय भरपाई कितपत साध्य झाली, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. योग्य देखभाल, पाणीपुरवठा आणि संरक्षणाचा अभाव ही झाडे न जगण्यामागील प्रमुख कारणे असल्याचे सांगितले जाते. परिणामी, केवळ लागवडीच्या आकड्यांपेक्षा झाडांच्या जिवंत राहण्याच्या प्रमाणावर अधिक भर देण्याची गरज अधोरेखित होत आहे.

## सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार ठरला, बारामतीत काँग्रेसचे 'धनगर कार्ड', आकाश मोरेंच्या नावाची घोषणा

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसचा उमेदवार ठरला असून आकाश मोरे (-ज्ञरीह चीश) यांच्या नावाची पक्षाकडून घोषणा करण्यात आली आहे. काँग्रेसने आकाश मोरे यांच्या नावाची घोषणा केली असून ते सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. बारामतीची निवडणूक ही बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न केले जात होते, मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचा त्यामध्ये यश आल्याचं दिसत नाही.

काँग्रेसने बारामतीमध्ये धनगर कार्ड खेळण्यात आलं असून आकाश मोरे यांना सुनेत्रा पवार यांच्याविरोधात पोटनिवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आलं आहे. काँग्रेसने ही घोषणा केल्यानंतर आता महाविकास आघाडीतील शरद पवारांची राष्ट्रवादी आणि ठाकरेंची शिवसेना यावर काय निर्णय घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. लोकशाही टिकवण्यासाठी आम्ही निवडणूक लढवत असून आमचा मूळ शत्रू हा भाजप आहे अशी पहिली प्रतिक्रिया आकाश मोरे यांनी दिली. बारामतीमध्ये अनेक मुद्दे असून त्यामध्ये अजित पवारांच्या अपघाताच्या तपासाचा मुद्दाही आहे, या मुद्द्यांना वाचा फोडण्यासाठी आम्ही ही निवडणूक लढवत आहोत असंही आकाश मोरे यांनी म्हटलं. जर



सरकारने अजित पवारांच्या अपघातावर गुन्हा दाखल केला तर उमेदवारी मागे घेऊ असंही ते म्हणाले. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्या विरोधात ज्या उमेदवाराची घोषणा केली आहे ते आकाश मोरे हे वकील आहेत. त्यांचे वडील विजय मोरे हे आमदार होते. आकाश मोरे यांनी २०१४ साली विधानसभा निवडणूक लढवली होती. ते काँग्रेसच्या विचाराने प्रेरित आहेत.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला असणाऱ्या बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी जोरदार प्रयत्न केले केले. प्रसंगी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांची भेट घेऊ असं राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे यांनी म्हटलं होतं. सुनेत्रा पवारांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी दूरध्वनीवरून संवादही साधला होता. मात्र काँग्रेसने या ठिकाणी उमेवदार दिला आहे.

## लोखंडी रिंग कोसळून बी. टेकच्या विद्यार्थ्याचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून एक अतिशय धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. बास्केटबॉलच्या रिंगला पुश-अप मारताना लोखंडी रिंग कोसळून बी. टेकच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना तळेगावातील इंदुरी परिसरात घडली आहे. विपुल वर्मा असं मृत विद्यार्थ्याचं नाव असून तो उत्तर प्रदेशातील अयोध्येचा रहिवासी होता.




या घटनेनंतर महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नेमकी चूक कुणाची याचा तपास सध्या सुरू आहे.पुण्यातील कोंढवा परिसरात पुन्हा एकदा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात १८ वर्षीय अरिझ शेख या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. क्लाउड ९, आनंदवन परिसरात ही घटना घडली आहे. परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, टँकरने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला आहे. अपघातानंतर संबंधित चालकाला ताब्यात घेऊन कालेपाडळ पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

## आई-बाबा मला माफ करा तरुण सराफाच्या आत्महत्येने खळबळ; सुसाईड नोटमध्ये तरुणीवर गंभीर आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

प्रेमाच्या जाळ्यात अडकवून लग्नाचे आमिष दाखवत फसवणूक केल्याच्या मानसिक धक्क्याने फुरसुंगी परिसरात एका तरुण सराफ व्यावसायिकाने दुकानातच गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी सराफाने १२ पानी सुसाईड नोट लिहून तरुणीवर गंभीर आरोप केले आहेत. तसेच आत्महत्येमागील कारणांचा उल्लेख केला आहे. प्रतिक राजेंद्र मेमाणे (२९, रा. फुरसुंगी) याने आत्महत्या केली असून त्याचे वडील राजेंद्र मेमाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तरुणीविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

हा प्रकार नोव्हेंबर २०२५ ते ६ मार्च २०२६ या कालावधीत घडल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्या माहितीनुसार, प्रतीकचे




फुरसुंगी येथे शर्वरी ज्वेलर्स नावाचे सोने-चांदी विक्रीचे दुकान आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्याची तरुणीशी ओळख झाली. पुढे या ओळखीचे प्रेमसंबंधात रूपांतर झाले. तिने लग्नाचे आमिष दाखवत प्रतीककडून ५० हजारांची सोन्याची अंगठी, ड्रेस आदी भेटवस्तू घेतल्या होत्या. तिने स्वतःला कॅन्सर झाल्याचे खोटे सांगितल्याचीही माहिती समोर आली आहे. दरम्यान, प्रतीक लग्नासाठी तयार असतानाही ही तरुणी सतत भेट टाळत होती. यामुळे प्रतीक मानसिक तणावाखाली आला. अखेर हा ताण असह्य झाल्याने त्याने दुकानात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेनंतर सुरुवातीला फुरसुंगी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मात्र, तपासात सुसाईड नोट मिळाल्यानंतर तरुणीविरूद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. प्रतिकने आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये संबंधित तरुणीवर गंभीर आरोप केले आहेत. फसवणुकीमुळे मानसिक संतुलन ढासळल्याचा उल्लेखही त्याने केला आहे. या नोटमध्ये तो म्हणतो, फसवणूक झाल्यानंतर जगण्याची इच्छा कमी झाली. आई-वडिलांसाठी जगण्याचा प्रयत्न केला, मात्र या धक्क्यातून बाहेर पडता आले नाही. मला ती खूप आवडत होती; पण तिने विश्वासघात केला. आई, वडील आणि ताई मला माफ करा. संबंधित तरुणीला कठोर शिक्षा व्हावी.

## कार पार्किंग करताना चिमुरडीचा चिरडून मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

चारचाकी लावताना शेडमध्ये झोपलेल्या ९ वर्षीय मुलीच्या अंगावरून वाहन गेल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना लोणीकंद परिसरातील वढूखुर्द येथे घडली. मैराबी रसुलसाब बळीगर ( ९) असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. याबाबत लालसाहेब महमंदसाब कालेगार ( ३९, रा. लोणीकंद, मूळ जुमलापूर, कर्नाटक) यांनी तक्रार दिली असून त्यानुसार चारचाकी चालक भरत रमेश नेहेते ( ४६, रा. रामनगर, वढूखुर्द) याच्याविरुद्ध लोणीकंद ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, मैराबी हिचे आई-वडील मजूर आहेत. वढूखुर्द येथील एका इमारतीचे बांधकामावर ते काम करतात. मैराबी ही बांधकामाजवळच्या पत्र्याच्या शेडमध्ये झोपली होती.दरम्यान, कार चालक नेहेते हे चारचाकी पार्क करण्यासाठी वाहन लावत होते. त्यावेळी अंधार असल्याने शेडमध्ये मैराबी झोपल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. तिच्या अंगावरून चारचाकी गेल्याने ती गंभीर जखमी झाली. त्यानंतर तिला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक घोडके करत आहेत.

## पुण्यातील ९ इमारती आणि ३२ वाडे पावसाळ्यापूर्वी जमीनदोस्त होणार ?

### महापालिका बळाचा वापर करून कारवाई करण्याची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका कर्मचाऱ्यांसाठी पन्नास-साठ वर्षांपूर्वी बांधलेल्या ९ धोकादायक इमारती पावसाळ्यापूर्वी रिकाम्या करून पाडणार असल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. या इमारती वाकडेवाडी येथील पाटील इस्टेट परिसरातील आहेत. या इमारती मोडकळीस आल्या असून पावसामुळे त्या कधीही पडतील अशी त्यांची अवस्था आहे. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसाचे प्रमाण पाहता पावसाळ्यात किंवा त्यापूर्वी पुन्हा असा पाऊस झाल्यास कामगारांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

यामुळे या ९ इमारती तसेच शहरातील धोकादायक ३२ वाडे पाडण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. महापालिकेने कर्मचाऱ्यांसाठी या इमारती बांधल्या आहेत. ५ एकर जागेत या नऊ इमारती असून प्रत्येकी तीन मजल्यांच्या इमारतींमध्ये सुमारे २८८ सदनिका आहेत. या इमारती ५० ते ६० वर्षांपूर्वी बांधलेल्या आहेत. पालिकेने या इमारती रिकाम्या करून त्या ठिकाणी नवीन इमारती बांधण्याचे ठरवले आहे. त्यासाठी बांधकाम विभागाने कामगारांना नोटीसा दिलेल्या असल्या तरी



ते इमारती खाली करत नाहीत. या इमारती पाडण्यापूर्वी आपले तात्पुरते पुनर्वसन याच भागात करावे अशी त्यांची मागणी आहे. महापालिका त्यांना वारजे, हडपसर भागात घरे देण्यास तयार आहे. मात्र, कामगारांची तेथे जाण्याची इच्छा नाही. त्यांच्या इच्छेनुसार महापालिका त्यांना याच भागात सदनिका देऊ शकत नाही. एवढया मोठया प्रमाणावर आसपासच्या भागात सदनिका उपलब्ध नसल्याने त्यांना याच परिसरात घरे देणे शक्य नाही, अशी पालिकेची भूमिका आहे. या स्थितीत पालिका प्रशासनाने आता पुन्हा एकदा घरे रिकामी करण्यासाठी रहिवाशांना नोटिसा बजाविल्या आहेत.महापालिकेने मागील वर्षी शहरातील धोकादायक वाड्यांचे सर्वेक्षण केले होते. त्यात, ३२ वाडे कोसळण्याच्या स्थितीत असल्याचा निष्कर्ष हाती आला होता. यामुळे महापालिकेने या वाडयाच्या मालकांना तसेच रहिवाशांना नोटीसा बजाविल्या होत्या. मात्र, त्यांच्याकडूनही अद्याप वाडे रिकामे करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे, मालकांनी हे वाडे खाली करून उतरवले नाही तर पोलिसांच्या मदतीने हे वाडे रिकामे करण्याचे काम महापालिका करणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली.

## भिडे पूल परिसरात मेट्रो कामावरुन वाद; नदीत भराव टाकल्याने पूराचा धोका

**पुणे । प्रतिनिधी**

भिडे पूल परिसरात सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या कामामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणात भराव टाकण्यात येत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. नदीच्या दोन्ही काठांवरून शेकडो ट्रकभर माती व राडारोडा टाकल्यामुळे पुलाजवळील मोऱ्या जवळपास बंद होण्याच्या स्थितीत आल्या आहेत. त्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होऊन पूरस्थितीची भीती व्यक्त केली जात आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते सचिन बहिरट आणि बाबा सय्यद म्हणाले की, येत्या पावसाळ्यात या मानवनिर्मित अडथळ्यांमुळे पुराचा धोका अधिक वाढू शकतो. आधीच अल्पावधीत होणाऱ्या पावसामुळे शहरातील अनेक भाग जलमय होत असताना नदीपात्र अरुंद करण्याचे काम अत्यंत धोकादायक ठरू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. तब्बल ४२ किलोमीटर नदीपात्रात राडारोडा टाकून सुरू असलेला नदी सुधार प्रकल्प प्रत्यक्षात पुराला आमंत्रण देणारा ठरत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. भविष्यात यामुळे जीवित व वित्तहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. 'नदीसुधार की प्रशासनसुधार?' असा सवाल उपस्थित करीत नागरिकांनी या प्रकल्पाची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, नदीपात्रातील अडथळे त्वरित दूर करून संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.